सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २२९ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### न्या. सूर्यकांत भारताचे ५३ वे सरन्यायाधीश

**नवी दिल्ली :** भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून आज न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली. आज राष्ट्रपती भवनात हा समारंभ पार पडला. न्यायमूर्ती सूर्यकांत यांचा सरन्यायाधीश म्हणून कार्यकाळ ९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत राहील. उच्च न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयात पोहोचलेले न्यायमूर्ती सूर्यकांत यांना न्यायाधीश म्हणून दोन दशकांहून अधिक काळाचा अनुभव आहे.

### पंकजा मुंडेंच्या पीएला मध्यरात्री अटक

**मुंबई :** भाजप नेत्या आणि राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांचे



पीए अनंत गर्जे यांच्या पत्नी डॉ. गौरी यांनी राहत्या घरी गळफास घेत आयुष्य संपवल्याची धक्कादायक घटना घडली. अनंत गर्जे यांच्या सासरच्या मंडळींनी हत्येचा आरोप करत पोलिसांत धाव घेतली होती. या प्रकरणी पोलिसांनी एफआयआर दाखल केल्यानंतर मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी अनंत गर्जे याला अटक केली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास अनंत गर्जेला अटक केली आहे. वरळीमध्ये डॉ गौरी गर्जे यांनी स्वत:ला संपवल्याने मोठी खळबळ उडाली होती.

# आज श्रीराम जन्मभूमी मंदिर लोकार्पणाचा ऐतिहासिक सोहळा

## संपूर्ण मंदिराचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार

**अयोध्या :** भव्य श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या पूर्णत्वानंतर २५ नोव्हेंबर २०२५ रोजी मुख्य शिखरावर धर्मध्वजारोहण व संपूर्ण मंदिराचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, अयोध्या पुन्हा एकदा रामभक्तीच्या उत्साहाने उजळून निघणार आहे.

२०२० मधील भूमिपूजनापासून २०२५ पर्यंत मंदिर उभारणीची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने पुढे सरकली. ५ ऑगस्ट २०२० रोजी भूमिपूजनानंतर नकाशा मंजुरी, दगड हलवणी, मास्टर प्लॅन, पायाभरणी, गर्भगृहातील कूर्मशिला स्थापना आणि रोलर कॉम्पॅक्ट कॉँक्रीट तंत्रज्ञानाने पायाभरणीची मजबुती यासारखी महत्त्वाची कामे पूर्ण झाली.

२०१-२२ दरम्यान रामलल्लांची चांदीच्या





झोपाळ्यावर प्रतिष्ठापना, राष्ट्रपती व पंतप्रधानांसह अनेक मान्यवरांची भेट, दीपोत्सव, ३ऊबांधकाम सादरीकरण, गर्भगृह उभारणीचा शुभारंभ आणि मंदिर परिसरातील शिल्पस्थापना यांसारख्या घटना घडल्या. २०२३ मध्ये मंदिराच्या कोरीवकामाचे अनावरण, हुतात्म्यांच्या स्मरणार्थ दीपदान, प्राणप्रतिष्ठेची तयारी आणि धार्मिक विधींची मालिका आयोजित झाली. २२ जानेवारी २०२४ रोजी श्रीरामलल्लांची प्राणप्रतिष्ठा पार पडली.

त्यानंतर २०२४-२५ मध्ये राष्ट्रपती, पंतप्रधानांसह अनेक देशांच्या प्रमुखांची भेट, शत सहस्र चंडी महायज्ञ, प्रतिष्ठा द्वादशी, मासिक बैठका आणि रामजन्मोत्सव असे कार्यक्रम होत राहिले. आगामी २५ नोव्हेंबरला धर्मध्वजारोहणाने राम मंदिराच्या दीर्घ प्रतीक्षेत असलेल्या इतिहासाला औपचारिक पूर्णविराम मिळणार आहे.



# सासऱ्याच्या निवडणुकीने घेतला सुनेचा जीव!

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. कौसर गरगरे या कुरुंदवाड येथील महिलेने सासरच्या सततच्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. सासऱ्याच्या निवडणुकीसाठी तसेच पतीच्या व्यवसायाकरिता दहा लाख रुपये आणावेत, असा सातत्याने तगादा लावण्यात येत असल्यामुळे तिच्यावर मानसिक तणाव वाढत चालला होता, असा आरोप माहेरच्या नातेवाइकांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत केला आहे. तक्रारीनुसार, कौसरचा सासरा राजमहंमद गरगरे, सासू मुमताज गरगरे, पती इंजमाम राजमहंमद गरगरे (वय ३१) आणि जाऊ समिना इलहान गरगरे (वय २८ ) यांनी









**१० लाखांसाठी विवाहितेचा छळ, कोल्हापुरातील घटनेनं खळबळ**

वारंवार आर्थिक मागणीचा दबाव टाकला. पतीच्या व्यवसायासाठी आणि सासऱ्याच्या निवडणुकीच्या खर्चासाठी माहेरहून दहा लाख रुपये घेऊन ये, असा तगादा लावून तिच्यावर शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या घटनेमुळे हातकणंगले-कुरुंदवाड परिसरात खळबळ उडाली असून, विवाहित महिलांवरील छळाचा आणखी एक हृदयद्रावक प्रकार समोर आल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

फिर्याद मृत कौसर गरगरेचा भाऊ अल्ताफ इकबाल आवटी (रा. जयसिंगपूर, जि. कोल्हापूर) यांनी कुरुंदवाड पोलिसांत दाखल केली. २७ वर्षीय कौसरने गुरुवारी राहत्या घरी लोखंडी हुकास ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. दरम्यान, मुलीच्या आत्महत्येची माहिती समजताच जयसिंगपूर येथील माहेरहून मंडळी घटनास्थळी आली. त्यांना मुलीच्या आत्महत्येबाबत संशय आल्याने मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला. मात्र कारवाईबाबत पोलिसांनी समजूत घातल्यानंतर तणाव निवळला.

# मद्यधुंद कारचालकाने पाच जणांना उडवले

**सांगली :** सांगलीत मद्यधुंद कार चालकाने पाच जणांना उडवल्याची घटना घडली आहे. या अपघातात पाच वाहनधारक गंभीररित्या जखमी झाले आहेत. त्यातील तिघांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर सांगलीतील शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

मद्यधुंद कारचालक रात्री नऊ वाजेच्या सुमारास शहरातील बालाजी मिल रस्त्यावरून भरधाव वेगाने निघाला होता. कारचालक दारूच्या नशेत असल्याने त्याचा कारवरील ताबा सुटला. त्यामुळे त्याने कार आणि दुचाकी वाहनांना जोरदार धडक दिली.

अपघात इतका भीषण होता की वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला. यानंतर परिसरातील नागरिकांनी संबंधित वाहनावर दगडफेक केली. त्यानंतर मद्यधुंद वाहन४ चालकाला संतप्त नागरिकांनी चांगला चोप दिला.

# गर्जेंच्या बंगल्यासमोरच गौरीच्या पार्थिवाला दिला अग्नी

## पालवे-गर्जेंच्या नातेवाईकांमध्ये राडा, अहिल्यानगरच्या लेकीला अखेरचा निरोप

**अहिल्यानगर :** राज्याच्या पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांचे स्वीय सहायक अनंत गर्जे यांच्या पत्नीने शनिवारी मुंबईतील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. अनंत गर्जे यांच्या



**गौरीचे वडील पोलिसांसमोर ओक्साबोक्सी रडले**

कुटुंबीयांकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून केईएम रुग्णालयात डॉक्टर असलेल्या गौरी पालवे गर्जे यांची आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती समोर आली होती. परंतु, गौरी पालवे यांच्या कुटुंबीयांनी आमच्या मुलीची हत्या झाल्याचा आरोप केला होता. या पार्श्वभूमीवर सोमवारी गौरी पालवे गर्जे यांच्या पार्थिवावर अहिल्यानगर येथील मोहोज देवढे या मूळगावी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पालवे यांच्या नातेवाईकांनी अनंत गर्जे यांच्या घरासमोरच आपल्या मुलीवर अग्निसंस्कार व्हावेत, असा आग्रह धरला. यावरुन गर्जे आणि पालवे यांच्या नातेवाईकांमध्ये बाचाबाची झाली. पोलिसांनी मध्यस्थी करत हा वाद मिटवला. यानंतर अनंत गर्जे यांच्या घराशेजारीच डॉ. गौरी पालवे यांच्या पार्थिवाला अग्नी देण्यात आला.

डॉ. गौरी पालवे यांच्यावर अंत्यसंस्कार सुरु असताना तिच्या वडिलांना शोक अनावर झाल. ते सर्वांदेखत धाय मोकलून रडले. याठिकाणी अहिल्यानगरमधील पोलीस उपस्थित होते. या पोलीस अधिकाऱ्यांना गौरी पालवे हिच्या वडिलांनी रडतरडत आर्त विनवणी केली. 'तुम्हाला मुली असतील तर आम्हाला न्याय द्या. तुमच्या मुली गरीबाला द्या, श्रीमंतांच्या नादी लागू नका. श्रीमंतीच्या भपक्यावर जाऊ नका', असे गौरीच्या वडिलांनी रडतरडत सांगितले. हे दृश्य पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. सुरुवातीला गौरी पालवे यांच्या नातेवाईकांना अनंत गर्जे यांना अटक झाल्याची माहिती नव्हती. त्यामुळे पालवे यांच्या नातेवाईकांना डॉ. गौरी यांच्यावर अंत्यसंस्कार करणार नाही, अशी भूमिका घेतली होती. मात्र, पोलिसांनी त्यांना अनंत गर्जे यांना अटक झाल्याची माहिती देत त्यांची समजूत काढली. त्यानंतर गौरी पालवे गर्जे यांच्यावर अंत्यसंस्कार पार पडले.

# मुंबई लोकलचा चेहरा बदलणार : मुख्यमंत्री

**मुंबई :** मुंबईकरांच्या लाईफलाईन असलेल्या लोकल ट्रेनचा लवकरच पूर्णपणे कायापालट होणार आहे. आता लोकल ट्रेनचे सर्व डबे मेट्रोप्रमाणे संपूर्ण वातानुकूलित करण्यात येणार आहे. तसेच या लोकलचे दरवाजे स्वयंचलित पद्धतीने बंद होणारे असतील, अशी मोठी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. ते युनायटेड नेशन्सचे भारतीय मॉडेल आयोजित युथ कनेक्ट सत्रात बोलत होते. युनायटेड नेशन्सचे भारतीय मॉडेल आयोजित युथ कनेक्ट सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्रात बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी पुढील ५ वर्षात अनेक विकासात्मक बदल होणार आहेत अशी माहिती दिली.

मुंबईची जी लोकल आहे, ज्यातून साधारण ९० लाख लोक दररोज प्रवास करतात. त्यात आपण मोठा बदल करणार आहोत. आपण मेट्रो तर इतकी चांगली बनवली आहे. पण मुंबई लोकलमध्ये आजही लोक लटकून प्रवास करतात. यात जो खरा मुंबईकर आहे तोच प्रवास करू शकतो. ऐन गर्दीच्या वेळी बाहेरची व्यक्ती त्या लोकलमध्ये घुसूच शकत नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. मात्र आता आम्ही यात मोठा बदल करणार आहोत. आता आम्ही लोकलचे सर्व कोच हे मेट्रोप्रमाणे करणार आहोत. ते आता पूर्णपणे एअर कंडिशन असणार आहेत. त्याचे दरवाजे आता बंद होणार आहेत.

आम्ही इतकी सुंदर लोकल बनवणार असलो तरी सेकंड क्लासचे तिकीट एक रुपयांनीही वाढणार नाही. तितक्याच तिकिटाच्या दरात तुम्हाला मेट्रो प्रवासाप्रमाणे अनुभव लोकल प्रवासात करता येणार आहे, अशी मोठी घोषणा देवेंद्र फडणवीसांनी केली.

रोजचा प्रवास अधिक सुखकर आणि आरामदायक

लोकल ट्रेनमध्ये दरवाज्यांवर लटकून प्रवास करताना होणारे अपघात आणि गर्दीमुळे प्रवाशांना होणारा त्रास लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. मेट्रो स्टाईलचे एअर कंडिशन डबे आणि बंद दरवाजे यामुळे प्रवाशांची सुरक्षितता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. तसेच मुंबईकरांचा रोजचा प्रवास अधिक सुखकर आणि आरामदायक होईल, असा विश्वास यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.




लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कन्हेरी चौकात सिग्नल सुरु करण्याची मागणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ नोव्हेंबर :** लातूर शहरातील राजीव गांधी चौक ते नांदेड जाणाऱ्या रिंग रोडवरील कन्हेरी चौकात दररोज सायंकाळी मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असल्याने किमान गर्दीच्या वेळेत वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी या ठिकाणी सिग्नल सुरु करण्यात यावेत, अशी मागणी कन्हेरी चौक परिसरातील नागरीकातून केली जात आहे.लातूर शहरातील वाहतूक कोंडीचा विषय आता काही नवीन राहिलेला नाही. शहराचा असा एखादाच रस्ता असावा, जेथे वाहतूक कोंडी होत नाही. राजीव गांधी चौकापासून नांदेडकडे जाणाऱ्या या रस्त्यावर दररोज सायंकाळच्या सुमारास वाहनांच्या मोठमोठ्या रांगा लागलेल्या पाहायला मिळतात. वाहनांची संख्या जरी कमी असली तरी प्रत्येकजण आपलेच वाहन पुढे रेटण्याचाप्रयत्न करत असतो. त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी येणारी वाहने अडकतात. परिणामतः सगळी वाहतूक खोळंबते. कन्हेरी चौकात वाहतूक जाम झाली की, त्याचे परिणाम राजीव गांधी चौक, वसंतराव नाईक चौक याठिकाणावरच्या वाहतुकीवरही होतात. पर्यायाने हा संपूर्ण रिंगरोडचजामहोऊन जातो. त्यामुळे कन्हेरी चौकात सिग्नल सुरु करण्यात यावेत, अशी मागणी केली जात आहे.



सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat

# लातुरात विकास कामांच्या नावाखाली जनतेच्या पैशांची उधळपट्टी!

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ नोव्हेंबर :** लातूर शहरात विकास कामांच्या नावाखाली जनतेने भरलेल्या कर रुपी पैशांची खुलेआम उधळपट्टी सुरु असल्याचे दृष्टीक्षेपास येत आहे. शहरातील जुन्या रेल्वे लाईनलगतच्या विलासराव देशमुख मार्ग रस्त्यावर मागच्या काही दिवसांपासून डांबरीकरणाचे काम चालू आहे. या रस्त्याच्या कामावर शेकडो कोटी रुपयांची उधळण मागच्या अनेक वर्षात झाल्याचे तमाम लातूरकरांनी पाहिले-अनुभवले आहे. विकास निधी खर्च करायचाय म्हणून तसेच कंत्राटदारांना जगविण्यासाठी प्रशासनाने हा उद्योग चालविला आहे की काय? असा संतप्त प्रतिक्रिया जनसामान्यांतून उमटताना दिसत आहेत.

लातूर शहरातील मिनी मार्केटजवळील राजस्थान विद्यालयाच्या कोपऱ्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंतच्या जुन्या रेल्वे लाईन वरील रस्त्याला विलासराव देशमुख यांचे नाव देण्यात आले आहे. दिवंगत लोकनेत्याच्या नावाच्या मोठेपणाचा फायदा उचलून आतापर्यंत या रस्त्याच्या कामावर शेकडो कोटी रुपयांचा खर्च करण्यात





आला आहे. काही वर्षांपूर्वी राजस्थान विद्यालयाजवळ, जुन्या रेल्वे क्रॉसिंग नजिक मोठी कमानही उभारण्यात आली होती. कालांतराने ती कमान तोडण्यात आली. शहरात विकास कामांसाठी निधी आलाय आणि तो आता कोठे खर्च करायचा ? असा प्रश्न समोर आल्याबरोबर फक्त याच रस्त्याचे नाव पुढे केले जाते की काय? असा प्रश्नही आता सुजाण लातूरकरांसमोर आ वासून उभा राहताना दिसतोय. सामान्य लातूरकरांच्या सेवेसाठी हा रस्ता केला जातोय की कंत्राटदार जगविण्यासाठी अशा भावना लोकांतून व्यक्त केल्या जात असल्याचे वारंवार ऐकावयास मिळते. या मार्गावर काही वर्षांपूर्वी देशिकेंद्र विद्यालयासमोर आवश्यकता नसताना उड्डाण पूल उभारण्यात आला होता. पुलाखालून शालेय विद्यार्थी आणि वाहनांची ये जा चालत असे. कालांतराने याच रस्त्यावरील कमानीप्रमाणे तो उड्डाणपुलही जमीनदोस्त करण्यात आला. या सगळ्या कामांवर नागरिकांकडून कराच्या माध्यमातून वसूल करण्यात आलेला पैसाच खर्च करण्यात आला होता. रस्ता काही वर्षांनी उखडायचाच असेल तर तो अगोदर बांधलाच का? असे एक ना अनेक प्रश्न त्यामुळे निर्माण होताना दिसत आहेत.

आता याच बऱ्यापैकी चांगला असणाऱ्या रस्त्यावर डांबरीकरणाचे थातुर मातुर काम चालू आहे. या कामाचा एकंदर दर्जा पाहता पुढचा पावसाळाही हा रस्ता बघणार नाही, हे तात्काळ लक्षात येते. अगोदरच्या जुन्या रस्त्यावर अवघ्या एक दिड इंच आकारमानाएवढे डांबर टाकून हे काम चालू आहे. काही रस्त्याचे काम पूर्ण झाले असून आणखी काही काम बाकी आहे. हे काम सुरु केले नसते तरी फारशी अडचण झाली नसती. मात्र, कदाचित विकासाच्या नावाखाली आलेला पैसा खर्च करण्याच्या उद्देशाने सदरील काम चालू असल्याचे दृष्टीपथास येते. विकास कामे व्हावीत, पण ती किमान एक दोन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळापर्यंत टिकणारी असावीत. नागरिकांनाही या रस्त्याचा उपभोग घेतल्याचे पुरेपूर समाधान मिळाले पाहिजे. येथे मात्र पुढचे पाठमागचे सपाट अशी अवस्था दिसून येते. विकास कामांच्या नावाखाली अनेक ठिकाणी सावळा गोंधळ चालू असल्याचे बोलले जात असतानाच दस्तुरखुद्द लातूर शहरातच असे प्रकार सर्रास चालू असल्याचे पाहावयास मिळत आहे. लातुरात केवळ याच रस्त्याचे काम थातुरमातुर होतेय असे नाही. शहराच्या विविध भागात करण्यात आलेल्या अंतर्गत रस्त्यांच्या कामांचा दर्जाही अतिशय सुमार असा राहिला आहे. सामान्य नागरिकांनाही कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे कळते. पण, त्याचा उपयोग तरी काय ? जनतेच्या पैशांची अशा पद्धतीने चालू असलेली उधळपट्टी तात्काळ थांबविण्यात यावी व या कामांची कसून चौकशी करण्यात यावी,अशीही मागणी सुजाण लातूरकरांतून केली जात आहे. त्याचप्रमाणे मागच्या दहा पंधरा वर्षात या रस्त्याच्या उभारणी आणि दुरुस्तीसाठी किती कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे, याची माहिती प्रशासनाने सामान्यांसाठी खुली करून देण्याची मागणीही केली जात आहे.

# जिल्ह्यातील सराफ सुवर्णकार व्यापाऱ्यांचा संताप

## तीन वर्षीय कु. यज्ञाला श्रद्धांजली म्हणून एकदिवसीय मार्केट बंद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ नोव्हेंबर :** नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील मौजे डोंगराळे या गावात सुवर्णकार समाजातील केवळ तीन वर्षांच्या चिमुरडी कु. यज्ञा जगदीश दुसाने हिच्यावर झालेल्या अमानुष अत्याचारानंतर निर्घृण हत्या झाल्याची घटना घडल्याने संपूर्ण सुवर्णकार समाजात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या भयानक घटनेने समाजासह सर्वसामान्य नागरिकही हादरले आहेत.या निष्पाप बालिकेला न्याय मिळावा आणि दोषींना कठोरातली कठोर शिक्षा व्हावी, या मागणीसाठी लातूर जिल्हा सराफ सुवर्णकार असोसिएशनतर्फे सोमवारी संपूर्ण दिवस लातूर शहरातील तसेच जिल्ह्याभरातील सराफ सुवर्णकार मार्केट तसेच संबंधित व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात आली.

या बंदमध्ये सराफ सुवर्णकार व्यापाऱ्यांसह अटणीवाले, बंगाली कारागीर, गठायीवाले आणि इतर कारागीर मोठ्या संख्येने सहभागी झाले. दिवसभर मार्केट बंद पाळून व्यापाऱ्यांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला.या प्रसंगी असोसिएशनच्या वतीने




मा. जिल्हाधिकारी, लातूर यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले की, निष्पाप बालिकेला न्याय मिळेपर्यंत समाज शांत बसणार नाही. या गुन्ह्याची चौकशी जलदगतीने करून खटला फास्टट्रॅक न्यायालयात वर्ग करण्यात यावा आणि दोषींना फाशीची शिक्षा ठोठावावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रशासनाने अशा प्रकारच्या घृणास्पद आणि मानवतेला काळिमे फासणाऱ्या घटनांना रोकण्यासाठी कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी समाजाच्या वतीने मांडण्यात आली आहे.

या निवेदन प्रसंगी लातूर जिल्हा सराफ सुवर्णकार असोसिएशनचे राजाभाऊ बोकन, रामभाऊ चलवाड, विकास चामे, अमित भोसले, अजय भूमकर, बजरंग वर्मा, गजेंद्र बोकन, शुभम पाटील, शैलेश टेहरे, ओमकार तरटे, शिवनारायण माकणीकर, दत्ता पंडित, रवी पोद्दार, रामेश्वर पाटील, नामदेव पोतदार, जमादार आदी मान्यवर उपस्थित होते. व्यापाऱ्यांनी या निमित्ताने स्पष्ट संदेश दिला की, अशा पाशवी कृत्यांनी मानवी समाजाचे रूप कलंकित होते आणि त्यामुळे दोषींविरुद्ध आदर्श शिक्षा देणे अत्यंत आवश्यक आहे. निष्पाप यज्ञाच्या स्मृतीप्रित्यर्थ समाजाने एकजुटीने आवाज उठवून मानवतेचा दीप प्रज्वलित ठेवण्याचा प्रयत्न केला.

# लातूर रक्तदान महोत्सवात सहभागी व्हा : जिल्हाधिकारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ नोव्हेंबर :** संविधान दिनाचे औचित्य साधत लातूर शहरात आणि जिल्ह्यात वाढत्या रक्ततुटवड्याचा प्रश्न दूर करण्याच्या उद्देशाने लातूर शहरातील अकरा नामांकित सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन 'लातूर रक्तदान महोत्सव २०२५' चे भव्य आयोजन केले आहे. या महत्त्वपूर्ण उपक्रमात प्रत्येक लातूरकराने उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले असून, मानवसेवेच्या या महोत्सवाला व्यापक समाजाने साथ द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

या रक्तदान महोत्सवाची घोषणा करताना जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे म्हणाल्या की, रक्तदान ही अनमोल देणगी असून एका रक्तपुंजातून अनेक जिवांचे प्राण वाचू शकतात. लातूर जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये वाढत्या शस्त्रक्रिया, प्रसूती, अपघातग्रस्त आणि गंभीर रुग्णांच्या उपचारांसाठी रोज मोठ्या प्रमाणात रक्ताची गरज भासते. त्यामुळं सुरक्षित रक्तसाठा निर्माण करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेणे अत्यावश्यक बनले आहे.

'रक्तवीर लातूर - गौरव लातूर' या प्रेरणादायी ब्रीदवाक्याने सजलेल्या या महोत्सवाचे आयोजन २६ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले आहे. संविधान दिनाच्या दिवशी होणारा हा उपक्रम लोकशाही मूल्यांची आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ करणारा ठरणार आहे. रक्तदान महोत्सव लातूर जिल्हा न्यायालयातील गेट क्रमांक ३ येथे सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.०० या वेळेत पार पडणार असून इच्छुक नागरिकांनी या वेळेत रक्तदानासाठी उपस्थित राहावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

रक्तदानासाठी आवश्यक सर्व वैद्यकीय सुविधा, सुसज्ज रक्तपेढ्या, अनुभवी डॉक्टर्स, नर्सिंग कर्मचारी आणि प्रशिक्षित स्वयंसेवकांची व्यवस्था आयोजक संस्थांकडून करण्यात आली आहे. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची वैद्यकीय तपासणी तसेच नोंद प्रक्रिया सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण केली जाणार आहे. रक्तदानानंतर सहभागींना आवश्यक त्या सर्व सूचना व मार्गदर्शन प्रदान केले जाईल, असेही संस्थांनी स्पष्ट केले. लातूरकरांनी संविधान दिनाचे औचित्य साधून आयोजित या रक्तदान महोत्सवात सहभागी होत 'रक्तवीर लातूर' बनावे आणि 'गौरव लातूर' ही संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून साकारावी, असे आवाहन जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे आणि आयोजक संस्थांकडून करण्यात आले आहे.

हमाल गल्ली ते बालाजी मंदिर जाणाऱ्या सिमेंट रस्त्याची दुर्दशा सांगणारे छायाचित्र.






# प्रभाग क्र. ९ मधील सिमेंट रस्त्याची दुर्दशा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ नोव्हेंबर :** लातूर शहरातील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयापासून हमाल गल्ली ते बालाजी मंदिर जाणाऱ्या सिमेंट रस्त्याची अतिशय दुर्दशा झाल्याचे पाहावयास मिळते आहे. रस्त्यावरील खडी, गिट्टी आणि सळई उघडी पडल्याने वाहनधारकांना वाहने चालविताना अतिशय सावधगिरीने जावे लागत आहे. पावसाळ्यात तर या रस्त्यावरून जाताना अनेक वाहनधारक गंभीर अपघातांपासून थोडक्यात बचावले असल्याच्या प्रतिक्रिया या भागातील रहिवाशांनी व्यक्त केल्या.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयापासून जाणाऱ्या कोपऱ्यावरील एक रस्ता हमालगल्ली, गवळी गल्लीकडे जातो तर दुसरा रस्ता बालाजी मंदिरकडे जातो.

बालाजी मंदिरकडे जाणारा हा रस्ता तत्कालीन वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री अमित देशमुख यांच्या स्थानिक विकास निधी कार्यक्रम अंतर्गत उभारण्यात आला आहे. या रस्त्याच्या कामासाठी एकूण ८ लाख ८२ हजार ४२७ रुपये खर्च करण्यात आले असून हे काम अशहद कन्स्ट्रक्शन, लातूरला देण्यात आले होते. कारण अद्यापही या कामाचा फलक जागेवर सुस्थितीत आहे. त्यावर आजही प्रभाग क्र. ९ अंतर्गत हमाल गल्ली येथे अहमदखान ते खानापुरे घरापर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे असा मजकूर आजही त्या फलकावर अगदी स्वच्छपणे वाचायला मिळतो. मात्र, दुर्दैवाने या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याचे एकंदर परिस्थितीवरून दिसून येते. कार्यकर्त्यांना सांभाळण्यासाठी नेते कामाच्या दर्जाकडे न पाहता कार्यकर्ता नाराज होऊ नये म्हणून त्यांना अशा प्रकारची छोटी मोठी कामे देतात. ही कामे व्यवस्थित न करता नेत्याच्या नावाचा दुरुपयोग करून कार्यकर्ते अक्षरशः काम केले का तर केले हे दाखविण्यासाठी करत असल्याचे एकंदर परिस्थितीवरून दिसून येते. सिमेंटचा रस्ता असूनही या रस्त्याची अवस्था एखाद्या ग्रामीण भागातील रस्त्यालाही लाजवणारी असल्याचे पाहायला मिळते.

# प्रा.डॉ. दावणकर यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ नोव्हेंबर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, लातूर येथील भूगोल विषयाचे प्रा. डॉ. राजाराम दावणकर यांना पश्चिम बंगाल सरकारच्या वतीने राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार कोलकत्ता येथे प्रदान करण्यात आला.

हा सन्मान रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी उत्सव मंच, कनकुरगच्ची, कोलकत्ता येथे पार पडलेल्या शासकीय भव्य कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

पश्चिम बंगाल शासनाच्या वतीने आयोजित केलेल्या भव्य कार्यक्रमात हा पुरस्कार उच्च शिक्षण मंत्री ब्रात्या बासु, शिक्षक आमदार सुमती पांडे, मंत्रालयाचे सचिव पी एस मुखर्जी, शिक्षण



संचालक देवाशिष बाबु, यांच्या हस्ते प्रा डॉ.राजाराम दावणकर यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रा.डॉ. राजाराम दावणकर यांनी उच्च शिक्षण व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. भूगोल विषयातील त्यांचे संशोधन, मार्गदर्शन आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे त्यांना हा पुरस्कार उत्सव मंच, कनकुरगच्ची, कोलकत्ता येथे प्रदान करण्यात आला.

या सन्मानाने प्रा. डॉ.राजाराम दावणकर यांचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान अधोरेखित झाले असून, संस्थेचे सचिव प्राचार्य अंगदरावजी तांदळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बालाजी कांबळे, इरादा संघटनेचे अध्यक्ष श्री लक्ष्मण दावणकर, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. सुधीर लातुरे, रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन चे सदस्य प्रा. विशाल आयाचित डॉ. श्रीनिवास भंडे तसेच डॉ. शिवाजी गाडे, डॉ. शहाजी चव्हाण, डॉ. दत्तात्रय करंजकर, प्रा. श्रीराम नरवडे, ग्रंथपाल शामसुंदर उबाळे व सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# माजी आ. कव्हेकरांकडून गायकवाड परिवारातील नववधुवरास आशीर्वाद



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ नोव्हेंबर :** लातूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव विजयकुमार गायकवाड यांचे चि.कृष्णा व चि.सौ.कां. वैष्णवी हरिदास जाधव यांचा शुभ विवाह सोहळा थोरमोटे सभागृह येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या विवाह सोहळ्यास भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी उपस्थित राहून नववधुवरास पुष्पगुच्छ देऊन शुभ आशीर्वाद दिले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. प्रतिभाताई पाटील कव्हेकर, भाजपाचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, संजय शेटे, संतोष तिवारी, राजेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### भय्याजी काणे जन्मशताब्दीची २९ नोव्हेंबरला सांगता; राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी यांची उपस्थिती



**पुणे, दि. २४ नोव्हेंबर :** पूर्वोत्तर भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेसाठी जीवन समर्पित करणारे भय्याजी काणे यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सांगता २९ नोव्हेंबरला (शनिवारी) होत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुरेश तथा भय्याजी जोशी यावेळी उपस्थित राहणार आहेत. बीएमसीसी महाविद्यालयाच्या टाटा सभागृहात सायंकाळी ५ वाजता हा कार्यक्रम होईल. अशी माहिती पूर्व सीमा विकास प्रतिष्ठानचे कार्यवाह जयवंत कोंडविलकर यांनी दिली. शिक्षणाच्या माध्यमातून पूर्वोत्तर भारतात राष्ट्रीय एकात्मतेसाठी शंकर दिनकर काणे अर्थात भय्याजी काणे यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. २०२४-२५ हे त्यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. त्या निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन पूर्व सीमा विकास प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले. या जन्मशताब्दी वर्ष सांगता कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून क्विकहील टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष कैलाश काटकर आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर उपस्थित राहणार आहेत.

### शिल्पाराणी वाडकर यांचा भाजपात प्रवेश




**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ नोव्हेंबर :** शिवसेना (शिंदे गट) महिला आघाडी जिल्हाप्रमुख आणि नगरसेविका शिल्पाराणी वाडकर यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजपा शहर कार्यालयात जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या हस्ते त्यांचा औपचारिक पक्षप्रवेश कार्यक्रम पार पडला. वाडकर यांनी भाजपाच्या विकासाभिमुख कार्यपद्धतीवर विश्वास दाखवल्याचे शितोळे यांनी सांगितले. त्यांच्या प्रवेशामुळे शहरातील पक्ष संघटनेला नवे बळ मिळेल, असे त्यांनी नमूद केले. पक्षातील सूत्रांनीही त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपाचे नगरसेवक सर्वाधिक संख्येने निवडून येतील आणि महापौरपद देखील पक्षाच्याच वाट्याला जाईल, असा आत्मविश्वास भाजपा नेतृत्वाने व्यक्त केला.

### श्री सरस्वती भुवन प्रशालेत एनसीसी दिवस




**बिडकीन, दि. २३ नोव्हेंबर :** २३ नोव्हेंबर हा दिवस एनसीसी विभागामार्फत साजरा करण्यात आला. वंदे मातरम गीताचे गायन सामूहिकरीत्या विद्यार्थ्यांनी केले. राष्ट्रीय एकता व बालविवाह प्रतिबंध या विषयावर विद्यार्थ्यांची पेंटिंगची स्पर्धा घेण्यात आली. प्रथम क्रमांक शर्मा अर्जुन हरीचंद्र, द्वितीय क्रमांक सेंधवकर चंचल संतोष, तृतीय क्रमांक गरड राधिका नंदकिशोर हिचा आला. पेंटिंगच्या स्पर्धेत २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. एनसीसी दिवस उत्साहात साजरा केल्याबद्दल श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थाचे डॉ. मिलिंद कोणार्डे, प्रशालेचे अध्यक्ष किसनलाल तोतला. मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, शाखा सदस्य नंदकुमार वैद्य,डॉक्टर अंतराम धरपळे, मच्छिंद्र पाटील हाडे, बबन ठाणगे, राजेंद्र कुलकर्णी, कुलकर्णी किशोर व जगन्नाथ आर्वीकर, उपमुख्याध्यापिका मिश्रा मनिषा, प्रभारी पर्यवेक्षक बाहाळकर व शिंदे राजू यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### निर्मलाबाई तिवारी यांचे निधन



**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ नोव्हेंबर :** शहरातील निर्मलाबाई तिवारी (वय ७४) यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी निधन झाले त्यांच्या वर शोककळा वातावरणात अंत संस्कार करण्यात आले. भाजपाचे शहर चिटणीस अतुल प्रसाद यांच्या आत्या होत.

### छबाबाई सोनार यांचे निधन



**छत्रपती संभाजीनगर, दि.२४ :** एन ४, सिडको येथील रहिवासी छबाबाई पंढरीनाथ सोनार (वय ९४) यांचे २३ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांचे पश्चात १ मुलगा, १, मुलगी सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या प्रियदर्शनी स्कूलचे मुख्याध्यापक संजीव सोनार यांच्या त्या काकू होत.

# मंदिराच्या माध्यमातून भक्तांसाठी बलोपासना केंद्र जिम आखाडा चालवण्याची व्यवस्था असावी: नेटके

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ नोव्हेंबर :** भारत मंदिराचा देश आहे. एकूण मंदिरांपैकी २० लाख मोठी मंदिरे भारतात आहे. यातील ४ लाख मंदिरे सरकारच्या ताब्यात आहेत. सदर मंदिरे सरकारच्या कब्जातून सोडवण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया चालू आहे. १६ लाख मोठी मंदिरे समाजाच्या ताब्यात आहे. यातील अर्ध्याहून अधिक मंदिरे आखाड्यांच्या ताब्यात आहेत. या सर्व मंदिरांमध्ये विश्वस्तांनी मुबलक जागा उपलब्ध असेल तर जिम आखाडे सुरू करावेत असे आवाहन विश्व हिंदू परिषद अखिल भारतीय मंदिर अर्चक पुरोहित आयाम प्रमुख अरुणजी नेटके यांनी केले. ते दिनांक २२ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता जागृत हनुमान मंदिर वाळूज संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या मंदिर विश्वस्त संमेलनात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून गरुडझेप अकॅडमीचे निलेश सोनवणे, मंदिर अर्चक पुरोहित, आयामाचे क्षेत्र संपर्कप्रमुख अनिल सांबरे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वाळुज जिल्हा संघ चालक अनिल पाटील, मंदिर अर्चक रोहित आयाम देवगिरी, प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार, वाळुज



भागपालक, दामोदर घुगे उपस्थित होते.

यावेळी बोलताना नेटके पुढे म्हणाले, हिंदू धर्म हिंदू संस्कृती तत्त्वज्ञान आणि व्यवहार यामध्ये मंदिराचे प्रचंड मोठे आगळे वेगळे अतुलनीय असे काम आणि भूमिका आहे. हिंदू समाजाला संघटित करणे श्रद्धावान करणे आणि त्यांच्या विकासासाठी विविध गोष्टींचे जागरणाचे प्रशिक्षणाचे केंद्र बनणे हे कार्य मंदिर परंपरेने करत आले आहेत.


मंदिरांनी गोशाळा चालवणे, वेदशाळा चालवणे,यज्ञशाळा चालवणे, आयुर्वेद शाळा चालवणे, व्यक्तिमत्व विकास वर्ग चालवणे, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका चालवणे, धार्मिक सोळा संस्काराची व्यवस्था करणे, वार्षिक व्याख्यानमाला चालवणे, रक्तदान नेत्रदान असे कार्यक्रम आयोजित करणे तसेच रुग्णोपयोगी साहित्य सेवा केंद्र चालवणे हे आणि असे अनेक उपक्रम मंदिरांनी राबवल्यास सर्व मंदिरे ही समाजाभिमुख बनतील आणि समाजाभिमुख बनण्याची आवश्यकता पण आहे.

सध्याचे युग हे प्रचाराचे युग आहे मंदिरे हिंदू धर्माचे मुख्य केंद्र आहे. त्यामुळे मंदिराच्या माध्यमातून हिंदू धर्माचे रक्षण आणि प्रचार होण्याची आवश्यकता आहे असेही त्यांनी सांगितले.

प्रमुख अतिथी निलेशजी सोनवणे यांनी आपले विचार व्यक्त केले तसेच क्षेत्र संपर्कप्रमुख अनिल सांबरे यांनी मंदिर अर्चक पुरोहित आयामाची भूमिका विशद केली. जिल्हा संघचालक अनिल पाटील यांनी जागृत हनुमान मंदिराच्या सध्या चालू असलेल्या उपक्रमाची माहिती दिली. वाळूज भाग-पालक दामोदर जी घुगे यांनी आभार मानले तसेच संजयजी तायडे यांनी सूत्रसंचालन केले.

## वेदश्री तपोवनात गीता जयंती महोत्सवाचे आयोजन

**पुणे :** वेदश्री तपोवन कार्य समितीसह सहयोगी संस्थांतर्फे श्रीमद् भगवद्गीता जयंती निमित्त तीन दिवसीय गीता जयंती महोत्सव आळंदीत आयोजित करण्यात आला आहे. आळंदी मोशी येथील वेदश्री तपोवन येथे दि. २९, ३० नोव्हेंबर आणि १ डिसेंबर रोजी हा महोत्सव होणार आहे. महोत्सवाचे यजमान पुण्याचे प्रसिद्ध उद्योजक आणि महर्षि वेदव्यास प्रतिष्ठानचे ट्रस्टी अभय सुरेशकुमार भुतडा हे आहेत.



या निमित्ताने गीता परिवारातर्फे पुणे जिल्हा स्तरावर शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन दि. २२ ते २७ नोव्हेंबर २०२५ या काळात केले आहे. विजेत्यांना पारितोषिके महोत्सवातच प्रदान केली जातील. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी दि.२९ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता ब्रह्मचारी हनुमान चैतन्य महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. यावेळी श्रीराम जन्मभूमि न्यास अयोध्या चे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज उपस्थित राहणार आहेत. तर, सकाळी ११ वाजता उद्घाटन सोहळा असून या कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि आळंदीचे ह.भ.प. डॉ. नारायण महाराज जाधव हे उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी वारकरी साधक सन्मान आणि ह.भ.प. डॉ. यशोधन महाराज साखरे यांचे कीर्तन होणार आहे.

दुसऱ्या दिवशी दि. ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता वेदश्री तपोवन द्वितीय चरण निर्माण शुभारंभ पूजन आणि महर्षी वेदव्यास पुरस्कार प्रदान सोहळा होईल. यावेळी कांची कामकोटी जगद्गुरू शंकराचार्य अनंतश्री विजयेंद्र सरस्वती महाराज आणि लोकसभेचे सभापती ओम बिर्ला हे उपस्थित राहणार आहेत. राजस्थान पत्रिका चे मुख्य संपादक गुलाबचंद कोठारी यांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तर, सायंकाळी ह.भ.प. डॉ. मकरंदबुवा रामदासी यांची कीर्तनसेवा होईल.

तिसऱ्या दिवशी दि. १ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते ११ श्रीमद्भगवद्गीता पारायण आणि संत श्री ज्ञानेश्र्वर पुरस्कार प्रदान कार्यक्रम होणार आहे. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते ह.भ.प. शांतिब्रह्म मारुती महाराज कु-हेकर यांना संत श्री ज्ञानेश्र्वर पुरस्कार आणि सी.एस. रंगराजन यांना स्वामी विवेकानंद पुरस्कार देण्यात येईल. यावेळी गीताधर्म मंडळाचे अध्यक्ष डॉ. मुकुंद दातार उपस्थित राहणार आहेत.

तीन दिवसीय महोत्सवात वेदश्री तपोवन द्वितीय चरण शुभारंभ भूमीपूजन, वेद स्वाहाकार यज्ञ, शालेय विद्यार्थी स्पर्धा, पारितोषिक प्रदान, वारकरी साधक पूजन, पुरस्कार वितरण, हरिकीर्तन, प्रवचन, श्रीमद्भगवद्गीता पारायण आदी उपक्रम होणार आहेत. वेदश्री तपोवन कार्य समितीसह महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान, संत श्री ज्ञानेश्र्वर गुरुकुल, गीता परिवार, श्रीकृष्ण सेवा निधी आदी संस्थांनी आयोजन केले आहे. तरी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महर्षि वेदव्यास प्रतिष्ठानचे ट्रस्टी श्री अभय भुतडा यांनी केले आहे.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये मूळव्याध रुग्ण मोठी वाढ

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ नोव्हेंबर :** जिल्ह्यात मूळव्याधांसाठी वैद्यकीय मदत घेणाऱ्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असल्याचे मेडिकव्हर रुग्णालयातील सल्लागारांनी स्पष्ट केले आहे. जागतिक अंदाजानुसार प्रत्येक दोन प्रौढांपैकी एकाला आयुष्यात किमान एकदा मूळव्याधाचा त्रास होतो. नोंदवलेल्या प्रकरणांमध्ये पुरुषांचा वाटा ६०-७०% असून हा फरक जैविक कारणांपेक्षा सामाजिक संकोचामुळे असल्याचे डॉक्टरांचे मत आहे.

बहुतेक रुग्ण महिनोनमहिने अस्वस्थता व रक्तस्त्राव सहन केल्यानंतरच उपचारासाठी येतात, त्यामुळे स्थिती बिघडलेली असते, असे वरिष्ठ सर्जिकल सल्लागार डॉ. आनंद औटी यांनी सांगितले. वेळेवर निदान झाल्यास अनेक प्रकरणे आहार सुधारणा, फायबर वाढ, हायड्रेशन व सोप्या बाह्यरुग्ण प्रक्रियांद्वारे शस्त्रक्रियेशिवाय व्यवस्थापित होऊ शकतात.

कमी फायबरयुक्त आहार, बद्धकोष्ठता, दीर्घकाळ बसून काम, कमी पाणी पिणे आणि शौचालयात मोबाईलचा जास्त वापर हे प्रमुख जोखीम घटक असल्याचे तज्ञांनी सांगितले. ताजे रक्त जाणे, वेदना, सूज, खाज व अपूर्ण बाहेर पडल्याची भावना ही प्रमुख लक्षणे आहेत.

मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये जीवनशैली समुपदेशन, वैद्यकीय उपचार, बँडिंग, लेसर आणि कमीत कमी आक्रमक शस्त्रक्रिया उपलब्ध असून, वेळेवर हस्तक्षेप केल्यास रुग्ण लवकर सामान्य जीवनात परत येऊ शकतात, असे रुग्णालयाने सांगितले.

## टोयोटा एक्स्पीरिएन्शियल म्युझियमचे उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर, दि.२४ :** टोयोटा किर्लोस्कर मोटरने टीईएमचे (टोयोटा एक्स्पीरिएन्शियल म्युझियम) अनावरण केले आहे. टोयोटाच्या या अद्वितीय जीवनशैली व सांस्कृतिक केंद्रामध्ये एकाच छताखाली अर्थपूर्ण राहणीमानाचे भारतीय व जपानी संस्कृतीसोबत प्रगत तंत्रज्ञान एकत्र करण्यात आले आहे. शहरातील फिनिक्स मॉल ऑफ आशियामध्ये स्थित या टीईएममधून विश्वास दिसून येतो की, वेईकल्समध्ये गतीशीलता आणि नाविन्यतेला अधिक प्राधान्य दिले जाते.मॉलमधील तळमजल्यावर ८,२०० चौरस फूट जागेवर पसरलेले टीईएम पाच संवेदनांना जागृत करणारा अनुभव देते, ज्यामध्ये लक्षवेधक दृश्ये, प्रसन्न आवाज, आणि उत्साहवर्धक वातावरण आहे, ज्यामधून जपानी उत्कृष्टतेसोबत भारतीय उत्साहाचा अनुभव मिळतो.

## एमजीएम इंस्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपीला नॅकचे 'ए' मूल्यांकन

**छत्रपती संभाजीनगर, दि.२४ :** विद्यापीठ अनुदान आयोगाची स्वायत्त संस्था म्हणून देशातील विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांचे मूल्यांकन करणाऱ्या राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेकडून (नॅक) महात्मा गांधी मिशनच्या इंस्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपीला महाविद्यालयाला 'ए' मूल्यांकन प्राप्त झाले आहे. पहिल्याच सायकलमध्ये असे मूल्यांकन मिळवणारे हे देशातील एमजीएम इंस्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी हे भारतातील पहिलेच महाविद्यालय ठरले आहे. महाविद्यालयास हे मूल्यांकन प्राप्त झाल्याबद्दल या प्रक्रियेत सहभागी झालेल्या सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एमजीएम सॉल्ट येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, सचिव अंकुशराव कदम, विश्र्वस्त भाऊसाहेब राजळे, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, डॉ.गुलाबराव खेडकर, डॉ.म्हाळसाकांत जहागिरदार, प्रकल्प संचालिका डॉ.प्रेरणा दळवी, प्राचार्य शरद बाबू, सर्व प्राध्यापक व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव म्हणाले, नॅकने आपल्या




फिजिओथेरपी महाविद्यालयाला ए ग्रेड देऊन जे मूल्यांकन दिले आहे, याचा मला मनापासून आनंद झालं आहे. या नॅक प्रक्रियेत सर्वांनी चांगले काम केले असून हे सर्व श्रेय तुमचे आहे. सर्व स्टाफचे मी अभिनंदन करतो. येत्या काळामध्ये आपल्याला ए++ ग्रेड मिळवायचा आहे. हे आपण जे यश प्राप्त केले आहे. यामध्ये आपल्या नॅकचे टीमचे नेतृत्व ज्यांनी केले ते संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव यांच्या अथक परिश्रमाला जाते. आपण सर्व अधिकारी - कर्मचाऱ्यांनी खूप मोठे योगदान या प्रक्रियेत दिलेले आहे. आपण सर्व जण काम करीत राहा, पुढच्या वेळी यापेक्षाही अधिक चांगला ग्रेड आपल्याला मिळेल, असा विश्वास मी या निमित्ताने व्यक्त सचिव अंकुशराव कदम यांनी यावेळी व्यक्त केला. एमजीएमच्या प्रकल्प संचालिका डॉ. प्रेरणा दळवी म्हणाल्या, आमच्या नॅकच्या प्रवासात महाविद्यालयाच्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपले सर्वस्व पणाला या 'ए' ग्रेडसाठी २४ ु ७ काम केले आहे. एक परिवार म्हणून सर्वांनी आपले सर्वोत्तम दिले. महाविद्यालयात देशाच्या बहुतांश राज्यातील स्टाफ असल्यामुळे आमचा एसएसआर उत्तम होण्यास मदत झाली. हे आमचे यश सांघिक प्रयत्नांचे आहे.

आम्ही सर्वांनी खूप मेहनत घेतली आणि हे यश आम्हाला मिळाले. आम्ही आमचे सर्वोत्कृष्ठ दिले आणि आमच्या प्रयत्नांना यश आले, असे प्राचार्य शरद बाबू यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्राध्यापक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ.डॉश प्रकाश आणि डॉ.गौतमी खडके यांनी केले.

## अहमदनगर जिल्हा बँकेच्या चेअरमनपदी माजी आ. घुले पाटील

**अहिल्यानगर, दि. २४ नोव्हेंबर :** राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये विशेष नावलौकिक असलेल्या




अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमनपदी माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

चेअरमन पदाच्या निवडीसाठी संचालक मंडळाची विशेष सभा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मंगेश सुरवसे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. चेअरमनपदासाठी घुले यांच्या नावाचे सूचना अंबादास पिसाळ यांनी मांडली. प्रशांत गायकवाड यांनी त्या सुचनेस अनुमोदन दिले.

चेअरमनपदासाठी माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांचा एकच अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे पिठासीन अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मंगेश सुरवसे यांनी जाहीर केले. या निवडीबद्दल घुले यांचा सर्व संचालकांच्यावतीने व्हाईस चेअरमन माधवराव कानवडे यांनी केला.

सत्काराला उत्तर देताना नवनिर्वाचित चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील म्हणाले की, बँकेच्या संचालक मंडळाने माझ्यावर विश्र्वास ठेवून माझी चेअरमन पदी निवड केली आहे त्याबद्दल मी सर्व संचालकांचे आभार मानतो. आपल्या जिल्हा बँकेला वैभवशाली वारसा लाभला असून यास पात्र राहून शेतकरी बांधवांच्या उन्नतीसाठी मी कटीबद्ध आहे. याप्रसंगी घुले यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे देखील आभार मानले. या निवडीप्रसंगी व्हा. चेअरमन ॲड. माधवराव कानवडे, माजी मंत्री आमदार शंकरराव गडाख, आमदार मोनिकाताई राजळे, आमदार अशुतोष काळे, माजी मंत्री अण्णासाहेब मस्के, माजी आमदार भानुदास मुरकुटे, माजी आमदार राहुल जगताप, माजी चेअरमन सिताराम गायकर, संचालक सर्वश्री अरुण तनपुरे, अंबादास पिसाळ, प्रशांत गायकवाड, गणपतराव सांगळे, अमोल राळेभात, अमित भांगरे, करण ससाने, संचालिका सौ. अनुराधा नागवडे, सौ. आशाताई तापकीर, क्षितिज भैया घुले, अरुण पाटील, लांडे, पटेल आदी उपस्थित होते.

## अपूर्ण पॅनल घेऊन लोळगे लढवताहेत निवडणूक

**पैठण, दि. २३ नोव्हेंबर :** तिकीट वाटपात अनेक उमेदवारांना चुकीचा बी फार्म देऊन धूर्त राजकारणाची टीका झालेल्या पैठण नगर परिषद निवडणुकीत सुरज लोळगे हे अपूर्ण पॅनल घेऊन निवडणूक लढवत असून मतदार यांना आशीर्वाद देईल का. असा सवाल भाजपा पदाधिकाऱ्यांना पडला आहे.

पैठण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकिसाठी दिनांक २ डिसेम्बर रोजी मतदान होणार असून निवडणूक जिंकण्यासाठी भाजपा कडुन मोठी तयारी करण्यात आली होती, आधी महायुतीची चर्चा त्यानंतर सवती दिंडी आणि त्यात ईमाने इतबारे पक्षाचे काम करणाऱ्या अनेक पदाधिकाऱ्यांचे तिकीट कट केल्याने भाजपा टीम वर स्व पक्षातीलच कार्यकर्तानी राजीनामा मोहीम सुरु केली आहे. एकूण १२ प्रभागात २५ नगरसेवक पदाची जागा असतांना नेतृत्वाने दोन प्रभागात उमेदवारांना चुकीचा बी फार्म देऊन त्यांची उमेदवारीच रद्द केली. दुसरीकडे प्रभाग दहा मध्ये अ आणि ब जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल असतांना याठिकाणी फक्त एकालाच उमेदवारी देऊन एक जागा मोकळी ठेवण्यात आली आणि एका महिला उमेदवारावर अन्याय करण्यात आला. गडबडीत शहरात प्रचार कार्यालयाचे उदघाटन कारण्यात आले यावेळी जेष्ठ भाजपा पदाधिकाऱ्यांनी पाठ फिरवली. स्वतः,पत्नी, नातेवाईक, कामगार यांना उमेदवारी दिल्याची टीका लोळगेंवर होत आहे. अश्यात पैठण नगर परिषदेवर भाजपाचा नगराध्यक्षा होईल ही आशा धुरळ झाल्याचे अनेकांचे सांगणे आहे. उमेदवारीत हात दाखवणाऱ्या लोकांना आता आम्ही हात दाखवू असे अनेक पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. एकंदरीत अपूर्ण पॅनल घेऊन लोळगे नगर परिषद निवडणूक जिंकतील का असा सवाल उपस्थित होत आहे.

## अग्रलेख...

# कायद्यांचा फायदा होणे महत्त्वाचे!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार धडाकेबाज आणि दीर्घकालीन परिणाम करणारे निर्णय घेत असल्याचे सर्वांनी पाहिले आहे. २०१६ मध्ये घेतलेला नोटबंदीचा निर्णय, २०१७ मधील जीएसटी, २०१९ मधील कलम ३७० निष्प्रभ करणे हे ऐतिहासिक निर्णय घेतल्यानंतर मोदी सरकारने आता चार नव्या कामगार संहिता लागू केल्या आहेत. भारताचाच नव्हे तर जगाचा इतिहास पाहता कामगारांच्या नशिबी फारसे चांगले दिवस कधी आलेले नाहीत. शोषणासाठी उपलब्ध असलेले हक्काचे घटक म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाते. शासन अथवा शासनाच्या अधिनस्थ असलेले शासकीय, निमशासकीय कर्मचारी अथवा कामगार आणि खाजगी असंघटित क्षेत्रातील कामगारांची दैनावस्था अजूनही संपलेली नाही. श्रीमंत आणि गरीब यांच्यात जेवढी मोठी दरी आहे, तेवढीच शासकीय कर्मचारी आणि खासगी-असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या वेतनातही आढळून येते.

खाजगी-असंघटित क्षेत्रातील कामगारांना कोणत्याही प्रकारचे सामाजिक अथवा आर्थिक कवच लाभलेले नसते. बोटावर मोजण्याइतक्या खाजगी संस्थांमध्ये काही कामगारांना चांगले फायदे मिळतही असतील; पण सामाजिक लाभापासून वंचित असलेल्यांची संख्या प्रचंड आहे. केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या चारही कामगार संहिता आता कायदा बनल्या आहेत आणि त्या तत्काळ प्रभावाने लागूही झाल्या आहेत. देशात यापूर्वीही अनेक कामगार कायदे तयार करण्यात आले. यापूर्वीचे कायदेही कामगारांच्या हिताचेच होते; पण नेहमी प्रश्न येतो तो या कायद्यांची अंमलबजावणी करणारी शासकीय यंत्रणा किती इमानदार आणि सक्षम आहे याचा. दुर्दैवाने असेच म्हणावे लागते की, देशाला भ्रष्टाचाराची मोठी कीड लागलेली आहे. ती वाळवीसारखी देशाला पोखरत आहे. कायदे कितीही चांगले तयार करा, सरकारी यंत्रणाच जर भ्रष्ट असेल, तर कायद्यांचे फायदे अपेक्षित घटकांपर्यंत किंवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचतच नाहीत. देशातील जुने कामगार कायदे १९३० ते १९५० या काळात तयार करण्यात आले होते. वर्तमान परिस्थितीत ते मुळीच सुसंगत नव्हते. असे जुने २९ कायदे अत्यंत गुंतागुंतीचे आणि नियोक्त्यांसाठी पळवाट शोधता येईल, असे पूरक होते. केंद्र सरकारने हे सर्व जुने कायदे बाजूला केल्याने श्रम आणि मोबदल्याची रचना आता पूर्णपणे बदलणार आहे. आत्मनिर्भर भारताचे लक्ष्य गाठण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल म्हणजे या चार कामगार संहिता आहेत. या चार संहितांमधून वेतन संबंधित नियम, कामगार आणि व्यवस्थापन यांच्यातील संबंध, कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना, कामाच्या ठिकाणची सुरक्षा आणि आरोग्याच्या अटी स्पष्टपणे नमूद करण्यात आल्या आहेत. वेतन संहितेला संसदेत २०१९ मध्येच पारित केले गेले होते. नवीन कायदे असंघटित क्षेत्रातील कामगार आणि महिलांसाठी वेतन, आरोग्यविषयक सुविधा आणि सामाजिक सुरक्षा प्रदान करणारे असल्याचे केंद्रीय कामगार मंत्रालयाने म्हटले आहे. महिलांना रात्रपाळीत काम करण्याची मुभा मिळणार आहे, जी पूर्वी अनेक क्षेत्रांमध्ये नव्हती. तथापि, यासाठी कंपनीला सुरक्षा उपाययोजना कराव्या लागणार आहेत. कामगारांच्या आरोग्याकडेही लक्ष देण्यात आले आहे. ४० वर्षांवरील सर्व कामगारांची मोफत वार्षिक आरोग्य तपासणी अनिवार्य केली गेली आहे.

औद्योगिक संबंध संहिता, सामाजिक सुरक्षा संहिता आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कार्यस्थिती संहिता या तीन संहितांना २०२० मध्ये संसदेची मान्यता मिळाली होती. हे सारे नवे श्रम कायदे कामगारांच्या हिताचे असल्याचे दिसत आहे. कामगार आणि उद्योजक यांच्यातील संबंध नव्या श्रम कायद्याने सुलभ केले आहेत. विशेष म्हणजे, आता कामगारांच्या योगदानाची दखल घ्यावीच लागणार आहे. वेतनातील असमानता दूर होण्यास देखील मदत होईल. अर्थात्, स्थायी आणि अस्थायी कामगारांच्या वेतनातील तफावत कमी होईल काय, हा प्रश्न आहेच. कामगारांना कामाच्या ठिकाणी आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्याच लागणार आहेत. सोबतच सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभही मिळण्याची तरतूद आहे. उद्योजक आणि कामगार यांच्यातील संबंध स्पष्ट करण्यात आल्याने स्थायी, अस्थायी कर्मचाऱ्यांच्या लाभांची व्याख्या निश्चित करण्यात आली आहे. नवीन कामगार संहिता लागू झाल्याने ग्रॅच्युईटीचा मुद्दा अधिक सुटसुटीत आणि कामगारांच्या हिताचा झाला आहे. यापूर्वी कामगारांना ग्रॅच्युईटीचा लाभ मिळण्यासाठी किमान पाच वर्षे सेवा करावी लागत होती. आता अस्थायी कामगारांना एक वर्ष सेवा दिल्यानंतरही ग्रॅच्युईटीचा लाभ मिळणार आहे. नवीन लेबर कोड लागू झाल्याने भविष्य निर्वाह निधी मिळणाऱ्या कामगारांच्या संख्येत मोठी वाढ होणार आहे. कारण, आता स्थायी कामगारांबरोबच अल्पकालीन कामगार (गिग वर्कर्स), प्लॅटफॉर्म वर्कर्स यांनाही याचा फायदा होणार आहे. पण, यासाठी संबंधित कंपनीत भविष्य निर्वाह निधी कायदा लागू असणे आवश्यक असेल. सुटी मिळणे हा मुद्दाही सुटसुटीत झाला आहे. स्थायी आणि अस्थायी कामगारांना मिळणाऱ्या वेतनात जशी तफावत होती, तशीच मिळणाऱ्या सुट्यांबाबतही दिसून येते. नव्या कायद्यानुसार आता २० दिवस काम करणारा कामगार एका दिवसाच्या सुटीसाठी पात्र ठरणार आहे. याचा सर्वांत जास्त फायदा स्थलांतरित आणि कंत्राटी कामगारांना होईल. ज्या उद्योगात ३०० अथवा त्यापेक्षा जास्त कामगार काम करतात, तो उद्योगच कामगाराला स्थायी आदेश देऊ शकेल. यापेक्षा कमी कामगारांना स्थायी आदेश देण्यापासून सुट देण्यात आली आहे. यामुळे अनुपालनाचा भार कमी होणार आहे. यापूर्वी १०० कामगार असलेल्या संघटनांनाही कामगारांना स्थायी आदेश द्यावा लागत असे. नव्या कामगार कायद्यांनुसार कामगारांना नोकरी सुरू करताना नियुक्तिपत्र देणे अनिवार्य असेल. परिणामी रोजगाराच्या अटींमध्ये पारदर्शकता येण्यात मदत होईल. किमान वेतनाचा मुद्दाही तितकाच महत्त्वाचा आहे. देशभरात किमान वेतन नियम लागू होणार असल्याने जगण्यासाठी आवश्यक असलेले वेतन द्यावेच लागणार आहे आणि तेही ठरलेल्या तारखेनुसार. नियोक्त्यांना कामगारांना वेळेवर वेतन देणे कायद्याने बंधनकारक करण्यात आले आहे.

नव्या कामगार संहितांना डाव्या संघटना आणि काँग्रेसने विरोध करण्यास सुरुवात केली आहे. जवळपास दहा मोठ्या कामगार संघटना या कायद्याच्या विरोधात उतरल्या आहेत. केंद्र सरकारच्या या कायद्यांमुळे कामगारांचे मोठे नुकसान होणार असल्याचा आरोप करीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, भारतीय कम्युनिस्ट पार्टी, भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मा-ले) या पक्षांनी तामिळनाडूत ८ डिसेंबरला राज्यव्यापी बंद पुकारला आहे. आता ३०० कर्मचारी असलेले उद्योगही नव्या कायद्यानुसार दिवाळखोरीत निघाल्यानंतर बंद केले जाऊ शकतात. पूर्वी ही मर्यादा १०० कर्मचारी असलेल्या उद्योगांना लागू होती. लघु उद्योजकांना आता कारखाना बंद करण्यासाठी सरकारची परवानगी घ्यावी लागणार नाही. लघु उद्योगातच मोठ्या प्रमाणात कामगार आहेत. नव्या कायद्यांमुळे हे कामगार देशोधडीला लागणार आहेत. नवे श्रम कायदे हे हिंदुत्वाच्या अजेंड्यावर आधारित असून, उद्योगपतींना फायदे देणारे असल्याचा आरोप काँग्रेस आणि डाव्या संघटनांनी केला आहे. राष्ट्रीय पातळीवरील दहा कामगार संघटनांनी देशव्यापी संप पुकारण्याचा इशारा दिल्यानंतर केंद्र सरकारनेही त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याचे ठरविले. नव्या चार कामगार संहितांबाबत कामगार संघटना आणि अन्य संबंधित घटकांचा फिडबॅक घेतल्यानंतर या चार संहिता नव्याने अधिसूचित केल्या जाऊ शकतात. याचे कारण म्हणजे, नव्या कामगार संहितांना संसदेने जवळपास पाच वर्षांपूर्वी मान्यता दिली आणि अंमलबजावणी करण्याचा निर्णय आता घेतला आहे.

नव्या कामगार कायद्यांचे भवितव्य काय असेल, हे येणारा काळ ठरविणार आहे. सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे तो कायद्याचा फायदा कामगारांना मिळण्याचा! तो साध्य झाला तरच या नव्या संहितांचे चीज होईल.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# सरन्यायाधीशांनाही तीन वर्षे!

३४ वर्षे आणि १७ दिवस! या दोन आकड्यांची तुलना करणे अवघड असले तरी जगातील दोन मोठ्या लोकशाही देशांच्या न्यायपालिकेबाबतचे हे दोन आकडे बरेच काही सांगणारे आहेत.

अमेरिकेत सर्वोच्च न्यायालयात जॉन मार्शल यांनी सलग ३४ वर्षे सरन्यायाधीशपदी राहण्याचा विक्रम नोंदविला आहे आणि जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीत म्हणजे भारतात के. एन. सिंग नावाचे सरन्यायाधीश फक्त १७ दिवस सरन्यायाधीशपदावर होते. २५ नोव्हेंबर ते ११ डिसेंबर १९९१ या काळात ते २२ वे सरन्यायाधीश होते. न्या. के. एन. सिंग यांनी आपल्या १७ दिवसांच्या कार्यकाळात किती व कोणते निवाडे दिले याची कल्पना नाही. मात्र जॉन मार्शल यांनी आपल्या ३४ वर्षे ५ महिने व ११ दिवसांच्या कार्यकाळात अनेक ऐतिहासिक निवाडे दिले. त्यांच्या निवाड्यांनी अमेरिकन लोकशाहीला समृद्ध, सुसंगत व सुसंस्कृत केले. १७५-१८० वर्षांपूर्वी त्यांनी दिलेल्या निवाड्यांचा आजही संदर्भ दिला जातो.

**न्या. गवईंचा कार्यकाळ** : काल २३ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीश न्या. गवई आपल्या सहा महिन्यांच्या कारकीर्दीनंतर सेवानिवृत्त झाले आणि आज न्या. सूर्य कांत सरन्यायाधीशपदाची शपथ घेतील. त्यांचाही कार्यकाळ काही महिन्यांचा राहणार आहे. अशीच स्थिती देशाच्या सरसेनापतींची होत होती. काही लष्करप्रमुखांना एक दोन वर्षांचा कालावधी मिळत होता तर काहींना काही महिन्यांतच सेवानिवृत्त व्हावे लागत होते. एवढ्या कमी कालावधीत सरसेनापती देशाच्या सुरक्षेचा कोणता विचार करणार, कोणत्या नव्या बाबी लागू करणार? कोणती नवी दिशा देणार? किती सीमा भागांना भेट देऊ शकणार?

**तीन वर्षांचा कालावधी** : बहुधा याचाच विचार करीत सरकारने काही वर्षांपूर्वी एक निर्णय घेत सरसेनापती, वायुदल प्रमुख व नौदल प्रमुख यांचा कार्यकाळ तीन वर्षांचा असावा असा एक निर्णय घेतला. याचा फायदा म्हणजे देशाच्या सेनापतींना काही मूलभूत गोष्टींचा विचार करून योग्य तो निर्णय घेण्याचा, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी वेळ मिळू लागला. याचे सुपरिणाम दिसू लागले.

**सरन्यायाधीशांना का नाही?** : देशाच्या न्यायपालिकेत हे सूत्र का लागू करण्यात आले नाही? न्या. गवईंसारख्या कर्तबगार न्यायाधीशास केवळ सहा महिन्यांनंतर सेवानिवृत्त व्हावे लागत आहे. न्या. गवई यांच्यानंतर सरन्यायाधीश होणारे न्या. सूर्य कांत यांचा कार्यकाळ १४-१५ महिन्यांचा राहणार आहे. त्यांच्यानंतर सरन्यायाधीश होणारे न्या. विक्रमनाथ ७ महिने सरन्यायाधीश राहतील. न्या. पारडीवाला यांना दोन वर्षांचा कार्यकाळ मिळणार आहे. हा एक अपवाद वगळता सर्व सरन्यायाधीशांचा कार्यकाळ फार कमी राहणार आहे.



**पहिल्या महिला सरन्यायाधीश** : न्या. विक्रमनाथ यांच्यानंतर श्रीमती नागरत्ना पहिल्या महिला सरन्यायाधीश होतील. त्यांचा कार्यकाळ केवळ ३६ दिवसांचा राहणार आहे. पाच दिवसांचा आठवडा विचारात घेतल्यास सरन्यायाधीश म्हणून केवळ २२-२४ दिवस त्या सर्वोच्च न्यायालयात काम करतील. म्हणजे पहिल्या महिला सरन्यायाधीश एवढी नोंद होण्याव्यतिरिक्त त्यांची उपलब्धी काय राहणार आहे?

**घटनापीठाचे काय?** : सर्वोच्च न्यायालयात अनेक महत्त्वाची प्रकरणे वेळोवेळी जात असतात. त्यांच्या निवाड्यासाठी सरन्यायाधीश घटनापीठ नियुक्त करीत असतात आणि परंपरेनुसार सरन्यायाधीशच घटनापीठाचे प्रमुख असतात. मात्र, त्यांचाच कार्यकाळ काही दिवसांचा वा काही महिन्यांचा राहणार असेल तर ते कोणता निवाडा करणार? अनेक महत्त्वाच्या प्रकरणांचा यामुळे निवाडा होऊ शकलेला नाही. ते सारे विषय सर्वोच्च न्यायालयात सुनावणीअभावी पडून आहेत.

**हा तर भेदभाव** : सरन्यायाधीश नियुक्त करण्याच्या सध्याच्या प्रक्रियेत सेवाज्येष्ठतेचे पालन केले जात असले तरी एक वेगळा भेदभाव होतो. काही सरन्यायाधीशांना मोठा कार्यकाळ मिळतो तर काहींना फक्त काही महिन्यांचा. माजी सरन्यायाधीश न्या. चंद्रचूड यांच्या वडिलांना ७-८ वर्षांचा कार्यकाळ मिळाला होता आणि आता बहुतेकांना काही महिन्यांचा कार्यकाळ मिळतो. हा भेदभाव कशासाठी?

**निवृत्तीचे वय** : उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय वाढविण्यात यावे अशी एक सूचना वारंवार करण्यात येत आहे. मात्र, त्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. वकिलांसाठी निवृत्तीचे वय नाही, मात्र न्यायाधीशांसाठी ६५ ही वयोमर्यादा ठरविण्यात आली आहे. सध्याच्या युगात ६५ ही वयोमर्यादा कालबाह्य मानली जाते.

भारत सरकारचे ॲटर्नी जनरल के. के. वेणुगोपाल वयाच्या ८० व्या वर्षी ॲटर्नी जनरल होऊ शकतात. वयाच्या ९२ व्या वर्षी ते सर्वोच्च न्यायालयात वेगवेगळ्या राज्य सरकारांचे वकील होऊ शकतात आणि सरन्यायाधीशांसाठी ६५ ही वयोमर्यादा ठरविली जावी हा विरोधाभास नाही काय? या एका कारणामुळे काही नामवंत वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश होण्याऐवजी वकिली करणे पसंत केले.

**आजीवन न्यायाधीश** : अमेरिकेत तर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या सेवानिवृत्तीसाठी कोणतीही वयोमर्यादा ठरविण्यात आलेली नाही. ते आजन्म या पदावर राहू शकतात. जगात सर्वाधिक कार्यक्षम सर्वोच्च न्यायालय डेन्मार्कचे समजले जाते. तेथील न्यायाधीशांसाठी ७० हे सेवानिवृत्तीचे वय ठरविण्यात आले आहे. भारतासारख्या विशाल देशात सर्वोच्च न्यायालयात ३४ न्यायाधीश असताना लहानशा डेन्मार्कच्या सर्वोच्च न्यायालयात १८ न्यायाधीश आहेत.

**ब्रिटनमध्ये ७५ वर्षे** : ब्रिटनमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांसाठी ७५ ही वयोमर्यादा ठरविण्यात आली आहे. ब्रिटनमधील न्यायाधीशांच्या निवाड्यांचा संदर्भ भारतातील न्यायालयांमध्ये दिला जातो. फ्रान्समध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश ६७ वर्ष पूर्ण झाल्यावर निवृत्त होतात.

कोणत्याही न्यायाधीशासाठी अनुभव- अभ्यास या बाबी फार आवश्यक असतात. साठी गाठेपर्यंत तो जणू परिपक्वता गाठीत असतो आणि ६५ व्या वर्षी त्याला चक्क निवृत्त केले जाते. यातून एक अपप्रवृत्ती जन्मास आली आहे, ती म्हणजे सेवानिवृत्तीनंतर एखादे सरकारी पद मिळविण्याची. काही न्यायाधीश यावर डोळा ठेवून असतात.

**निवृत्तीनंतरची आश्रयस्थाने** : मानवाधिकार आयोग, हरित न्यायाधिकरण, वेगवेगळे लवाद, विधि आयोग, लोकपाल, परदेशातील नियुक्त्या अशी ही सेवानिवृत्तीनंतरची आश्रयस्थाने मानली जातात. या पदावर नियुक्त होणाऱ्या न्यायाधीशांकडे, त्यांच्या निवाड्यांकडे संशयाने पाहिले जाते. यात प्रामाणिक न्यायाधीशांवरही अन्याय होतो आणि मग या प्रक्रियेत न्यायाधीशाच्या व पर्यायाने सर्वोच्च न्यायालयाच्या प्रतिमेला तडा जातो. असे होऊ देण्याऐवजी सरकारने न्यायाधीशांच्या सेवानिवृत्तीचे वय वाढवावे, त्यांचे वेतन वाढवावे आणि नंतर मात्र त्यांना कोणतेही सरकारी पद घेण्याबाबत बंदी करावी.

**दोन फायदे** : न्यायाधीशांच्या निवृत्तीची वयोमर्यादा वाढविल्यास दोन फायदे होतील. पहिला फायदा म्हणजे न्यायाधीशांच्या अनुभवाचा फायदा देशाला, समाजाला मिळू लागेल आणि दुसरा फायदा म्हणजे सेवानिवृत्तीनंतर सरकारी पदे मिळविण्याच्या मानसिकतेवर अंकुश लागेल. याचा सकल परिणाम म्हणजे देशाच्या न्यायपालिकेची प्रतिमा उंचावली जाईल.

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# प्रेशर कूकर फुटतोय्!

आज सर्वांसाठी अगदी सर्वसामान्य आणि समसमान ठरलेली समस्या म्हणजे ताण. मग तो कामकाजी लोकांना असो किंवा नोकरदारांना, ताणतणाव कोणालाच चुकलेला नाही. असे तणावात असणारे लोक लहान मुलांकडे पाहून म्हणतात की, यांचे बरे आहे, यांना काही ताण नाही, काही मिळविण्याची धडपड नाही. मस्त निश्चिंत जीवन आहे. पण, दुर्दैवाने आता चित्र बदलले आहे.

मागील काही दिवसांमध्ये अगदी दिल्लीपासून नागपूरपर्यंत अनेक शाळकरी विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी बहुतांश विद्यार्थ्यांनी चिठ्ठी लिहून ठेवली की, आम्हाला शिक्षकांकडून त्रास होतोय्. कोणाला शिक्षक नृत्य सरावादरम्यान रागावले, तर कोणाला अन्य काही कारणाने. पण, हा ताण स्वतःचे जीवन संपवण्याइतका मोठा आहे का? आजकाल तसेही एक किंवा दोनच अपत्य असतात. त्यातही त्यांना तणावामुळे जीवन संपवावेसे वाटत असेल, तर पालकांनी कोणाकडे पाहावे? १०, १३, १६ हे वय हसण्या-बागडण्याचे असताना, त्या वयात स्वतःला संपवण्याचा विचार या चिमुकल्यांच्या मनात येणे, ही बाब अतिशय भयावह आहे. जेव्हा अशा घटना सातत्याने घडतात, तेव्हा एखादी सामाजिक समस्या आक्राळविक्राळ रूप घेऊन समोर येते आहे का, असे मंथन सुरू होते आणि ते व्हायलाही हवे.



आजच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीवर अनेक घटक परिणाम करतात. शैक्षणिक स्पर्धा, गुणांचे अत्याधिक महत्त्व, करिअरबाबत असलेले अपेक्षांचे दडपण आणि प्रत्येक क्षेत्रात 'परिपूर्ण' असण्याची सक्ती... ही काही प्रमुख कारणे आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर भावनिक ताण वाढत जातो. अनेक घटकांमुळे त्यांचा प्रेशर कूकर झालाय् की काय, असे वाटण्याइतपत स्थिती आहे. याशिवाय शिक्षकांकडून होणारा अपमान, समाजातील घटकांशी तुलना आणि घरच्या वातावरणातील अस्थिरता यांचाही गंभीर प्रभाव त्यांच्या मानसिक आरोग्यावर पडतो. भारतात राष्ट्रीय गुन्हे नोंदणीच्या आकड्यांनुसार, २०२३ मध्ये १३,८९२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या, जे प्रमाण गेल्या दहा वर्षांत सुमारे ६५ टक्क्यांनी वाढले आहे. तर २०२२ मध्ये ते आकडे १३,०४४ इतके असल्याचे अहवालात म्हटले आहे. या वाढत्या आकड्यांनी भारतातील विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची स्थिती किती गंभीर झाली आहे, याचे स्पष्ट चित्र समोर येते.

दिल्लीतील एका विद्यार्थ्याने शिक्षकांनी अपमान केल्याचे सांगत आत्महत्या केली. मुळात, शिक्षकांचे बोलणे म्हणजे अपमान असतो, ही धारणाच मनाला न पटणारी आहे. शिक्षक, पालक हे मुलांना आकार देणारे, प्रसंगी आधार देणारे घटक असतात. त्यांनी काहीतरी म्हटल्याने विद्यार्थ्यांना तो अपमान वाटावा, हे समाजाचे खरे बदललेले चित्र आहे. पूर्वी 'छडी लागे छम छम विद्या येई घम घम' हे गाणे किती आनंदात गायले जायचे. शिक्षकांच्या हातचा आम्ही इतका मार खाल्ला, हे सांगणारी पिढी अजूनही अस्तित्वात आहे. त्यापैकी अनेकजण आपल्या चांगल्या आयुष्याचे श्रेय शिक्षकांच्या शिस्तीला देतात. आता चित्र बदलले आहे. अर्थात्, नाण्याची दुसरी बाजू देखील आहेच. आज त्या तोडीचे शिक्षकही नाहीत, ही वास्तविकता आहे. पूर्वी शिक्षकी पेशा हे व्रत होते. आता तो दृष्टिकोन राहिलेला नाही. शिक्षकांपासून पत्रकारांपर्यंत जे कोणी व्रत वगैरे म्हणून काम करायचे, ते सारेच कारकून झाले आहेत. त्यामुळे कसेही करून काम हातावेगळे करायचे आणि आजचा दिवस ढकलायचा, ही प्रवृत्ती वाढीस लागली आहे. शेवटी तेही कुठेतरी व्यवस्थेच्या तणावाचे भुक्तभोगी आहेतच. पण, याचा अर्थ विशेषतः शिक्षकांनी कोणताही ताण विद्यार्थ्यांवर काढावा, हे योग्य नाहीच. बदलत्या काळात शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा जास्त काळजीपूर्वक अभ्यास करणे गरजेचे आहे. आज विद्यार्थ्यांवर असणाऱ्या ताणातून त्यांना पालक आणि शिक्षकच बाहेर काढू शकतात. यासाठी दोन्ही घटकांनी या उमलत्या कळ्या-फुलांना नीट समजून घेणे गरजेचे आहे. त्यांना पुरेसा वेळ दिला पाहिजे, त्यांच्या आवडीनिवडींचे निरीक्षण करून त्यात विधायक बदल केला पाहिजे. बदलत्या काळानुरूप मुलांच्या भावनिक आणि मानसिक जडणघडणीचा प्रवास काहीसा क्लिष्ट, गोंधळलेल्या स्वरूपाचा झाला आहे. त्यांना शांतपणे, समंजसपणे समजून घेणारे पालक आणि शिक्षक हवे आहेत. कारण जे स्वतः शांत आणि समंजस असतील, तेच गोंधळलेल्या बालकांना शांत करू शकतील. आता दिसणारे चित्र बदलावे, हाच यामागील प्रामाणिक उद्देश आहे.

७७५५९३८८२२

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# 'हिंद'ची चादर

शिखांचे नववे गुरू, गुरू तेगबहादूर यांना हिंदची चादर असे संबोधले जाते. 'हिंद'ची चादर म्हणजे हिंदुस्थानचे संरक्षक असा त्याचा अर्थ आहे. अधिकांश भारतावर त्यावेळेला मुगल बादशहा औरंगजेबाचे राज्य होते. तो धर्मवेडा होता. जवळपास सर्वच मुस्लिम बादशाहांप्रमाणे त्याला सुद्धा इतरांवर आपला धर्म थोपवायला आवडत होते. हिंदू धर्म मुगलांच्या राज्यात अत्याचार सहन करून आपले अस्तित्व टिकवून होता. ही गोष्ट त्याला आवडत नव्हती. त्यामुळे तो विविध ठिकाणी जबरदस्तीने लोकांचे धर्मांतरण करणे, लोकांवर अत्याचार करणे, त्यांचे प्राण घेणे, नरसंहार करणे अशा पद्धतीची कृत्ये करीत होता. परंतु त्याच्या सैन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर हिंदू सरदार सुद्धा होते. ते नाराज होतील व आपल्या विरोधात विद्रोह करतील, ही पण सातत्याने त्याला भीती असायची. त्यामुळे तो धर्मांतरणासाठी विविध युक्त्या वापरत असायचा.

एकदा त्याने काश्मीरमधील हिंदूंना व त्यातही विशेषतः काश्मिरी पंडितांना आदेश दिला की, तुम्ही सर्व मुसलमान बना. पंडितांसमोर धर्मसंकट निर्माण झाले. परंतु त्यांनी आपली अक्कल हुशारी वापरली व औरंगजेबाला त्यांनी निरोप पाठवला की आमचे राजे व गुरू हे गुरू तेगबहादूर आहेत. ते जर इस्लाम धर्म स्वीकारतील तर आम्ही सुद्धा इस्लामचा स्वीकार करू शकतो. औरंगजेब मनातून खुश झाला. त्याला असे वाटले की हजारो पंडित हे एका फटक्यात मुसलमान बनतील. ही फार मोठी संधी चालून आलेली आहे. त्यामुळे त्याने गुरू तेगबहादूर यांना आपला आदेश पाठविला की तुम्ही इस्लामचा स्वीकार करा. त्यासाठी त्याने त्यांना भेटीला येण्याचे निमंत्रण पाठविले. ज्या वेळेस गुरू तेगबहादूर यांना हा निरोप मिळाला, त्या वेळेला त्यांना समजले की आता त्यांचे आयुष्य फार थोडे राहिलेले आहे. त्यांनी आपल्या जवळच्या लोकांना विचारले की धर्मासाठी बलिदान करण्यासाठी कोणता महापुरुष योग्य आहे? हाच प्रश्न त्यांनी त्यांचा मुलगा गोविंदसिंह याला सुद्धा विचारला. त्यावेळी त्यावर हा लहानसा मुलगा म्हणाला की, धर्मासाठी बलिदान करण्यासाठी तुमच्यापेक्षा योग्य पुरुष कोण असू शकतो? आपल्या मुलाचे हे उत्तर ऐकून गुरू तेगबहादूर यांनी निश्चय केला की त्यांच्याकडे मदत मागायला जे काश्मिरी पंडित आलेले आहेत, त्यांना निराश करायचे नाही. ते त्या काश्मिरी पंडितांना म्हणाले की, तुम्ही निश्चिंतपणे जा व आपल्या धर्माचे पालन करा. मी औरंगजेबाच्या भेटीला जाईन आणि धर्माकरिता बलिदान करण्याचा प्रसंग आल्यास मी त्याहीसाठी सज्ज आहे. गुरू तेगबहादूर औरंगजेबाला भेटले. औरंगजेबाने त्यांना इस्लामचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. त्यावेळेला गुरुजींनी त्याला स्पष्टपणे नकार दिला. त्यामुळे औरंगजेबाने त्यांना मृत्युदंडाची शिक्षा दिली. धर्मासाठी त्यांनी आपले शिश म्हणजे मस्तक समर्पित केले. या घटनेचा संपूर्ण भारतावर परिणाम झाला. औरंगजेबाच्या धर्मांतरणाच्या विरोधामध्ये ठिकठिकाणी लोकांचा विद्रोह आणि उठाव होऊ लागला. गुरू गोविंदसिंह यांनी या पापी औरंगजेबाच्या विरोधामध्ये शिखांना संघटित केले, आपले सैन्य उभारले व औरंगजेबाशी प्रबळ लढाई मांडली. गुरू तेगबहादूरांच्या बलिदानातून संपूर्ण भारताला प्रेरणा मिळाली. त्यांच्या बलिदानामुळे हजारो लोक धर्मांतरित होण्यापासून वाचले. त्यांनी केलेले हे महान कार्य देश, धर्म, संस्कृती, इतिहास यासाठी प्रेरणास्पद आहे. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' म्हणजे हिंदची चादर, हिंदूंचा संरक्षणकर्ता असे म्हणतात. हा इतिहास इस्लामी अत्याचारांची कहाणी आहे. हजारो लोकांना ठार मारण्यात आले, हजारोंना धर्मांतरित करण्यात आले, हजारो महिलांवर अत्याचार झाले. याच विचारामुळे देशाचे दोन तुकडे झाले. ज्या पाकिस्तानची निर्मिती या कट्टरवादी विचारातून झाली, तो पाकिस्तान सुद्धा त्याच्या जन्मापासूनच आमचा वैरी बनलेला आहे. खरं पाहिलं तर भारत मातेच्या अंगभंगातून हिंदुस्थान आणि पाकिस्तान जन्माला आले. एकाच मातेच्या पुत्रांना आपण एकमेकांचे भाऊ समजतो. परंतु कट्टरवादी विचारसरणीच्या लोकांनी भारत मातेला कधीच भारत माता मानले नाही. त्यामुळे भारत मातेच्या अंगभंगातून जन्म घेऊन सुद्धा पाकिस्तान, हिंदुस्थानचा भाऊ होऊ शकला नाही. कोणीही एकमेकांचे भाऊ तेव्हाच होतात, जेव्हा त्यांची आई एक असेल. इथे तर त्यांनी भारत मातेला माता मानलेलेच नाही.

काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशमध्ये धर्मांतरणाचे रॅकेट चालविणारा छंगूर बाबा याला अटक करण्यात आली होती. काही महिन्यांपूर्वी मोबाईल गेमच्या माध्यमातून धर्मांतरणाचे प्रयत्न उघडकीस आले होते. कुठे बळजबरीने तर कुठे आमिष देऊन हे सर्व प्रकार देशामध्ये सुरूच असतात. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की धर्मांतरण हे राष्ट्रांतरण आहे. इथे राहणारा समाज बदलला की तिथे संविधानाचे राज्य समाप्त होते आणि धर्मवेडाचे राज्य सुरू होते.

संपूर्ण जगामध्ये यांचा इतिहास पाहिला तर धर्माच्या आधी यांची तलवार तिथे पोहोचलेली आहे आणि मग उठले आहेत असहाय लोकांचे चीत्कार, वाहिले आहे निरपराध लोकांचे रक्त! विश्वातील मानवतेने आणि शांतीने लज्जेने मान खाली घालावी इतका नरसंसार यांनी धर्माच्या नावावर केलेला आहे. आजही यांच्यातील कट्टरवादी विविध रूपांनी संपूर्ण जगभर थैमान घालतात. भारतालाही यांच्या कट्टरवादाची झळ नेहमीच पोचते. ज्या समाजाने यांना भावासारखे वाढविले, वागविले; प्रार्थना स्थळे बांधायला जमिनी दिल्या; आपल्या धर्माचे पालन करण्याची मुभा दिली, संधी दिली; अनुकूल वातावरण दिले, हे लोक त्याच समाजाचे गळे कापायला कमी करत नाहीत. हा त्यांचा इतिहास आहे.

गुरू तेगबहादूरांचे बलिदान हे वीर पुरुषाचे बलिदान आहे. शरीराला नश्वर मानणाऱ्या एका आध्यात्मिक गुरूचे बलिदान आहे. सर्व धर्म जर समान असते, तर गुरू तेगबहादूरांनी हसत हसत त्याच वेळेला आपला धर्म बदलविला असता व हजारो लोकांना यांचा धर्म स्वीकारण्याची प्रेरणा दिली असती. परंतु त्यांनी तसे केले नाही. यावरून त्यांचाही संदेश स्पष्ट आहे की, दहशत पसरविणारा हा धर्म स्वीकारण्यासारखा नाही. चंदीगड येथे काही पगडीधारी लोकांना मी प्रार्थना स्थळामध्ये जाऊन चादर चढविताना पाहिले. त्यावेळेला मला वाटले की, ज्या पंजाबने संपूर्ण देशाला ''धर्मासाठी मस्तक देऊ'' हा संदेश दिला, त्याच पंजाबचे सुपुत्र असे कृत्य करीत आहेत. यावरून पुन्हा एकदा गुरू तेगबहादूरांचा इतिहास सर्वांनाच सांगण्याची आवश्यकता आहे. आज गुरू तेगबहादूरांची पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त 'हिंद'ची चादर असलेल्या गुरू तेगबहादूर यांना शतशत नमन.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## संभ्रमच संभ्रम...!

आपले मन नित्य द्विधा अवस्थेत असते. काय करावे आणि काय करू नये या विचारातच अधिक वेळ आणि शक्ती खर्च होत असते. अशातच हाती असलेला भ्रमणध्वनी मनात अधिकच संभ्रमावस्था निर्माण करत असतो. आपली जीवनशैली कशी आहे यावर आपले आरोग्य अवलंबून असते आणि आरोग्य कसे आहे यावर आपली कार्यक्षमता अवलंबून असते.

वास्तविक ताणतणाव हाच मनात अधिक संभ्रम निर्माण करतो. आपली जीवनशैली निसर्गाच्या अनुरूप असावी. प्रांतानुसार तसेच ऋतूनुसार आहार घेतला तर आरोग्याच्या तक्रारी जवळजवळ नाहीशा होतात. आहार, विहार, व्यायाम आणि संयमाचे पालन नित्य नेमाने केले तर सगळे जीवन सहज होऊन जाते. आहार कधी, किती, कसा घ्यावा हे आपले आपण नियोजन केले पाहिजे तसेच व्यायामाचे देखील आहे. कोणी दोन वेळाच जेवण करा असे सांगतात तर कोणी चार वेळा. कोणी फक्त फळे खायला सांगतात तर कोणी चौरस आहार घ्यायचा असा सल्ला देतात, कोणी चार लिटर पाणी पिण्याचा आग्रह करतात तर कोणी तहान लागली की पाणी पिण्याची सूचना करतात. सोशल मीडियावर तर या संदर्भात अक्षरशः धुमाकूळ सुरू असतो आणि मग काय करावे काही सुचेना अशी मनाची अवस्था निर्माण होते. मनातील हा संभ्रम दूर करण्याचा काहीही उपाय इथे दिसत नाही हे मात्र खरे. थोडा आपल्या आरोग्याचा अभ्यास केला असता आपल्याला काय चांगले आहे आणि काय घातक आहे याची ओळख होते. आपल्या प्रकृतीनुसार पोषक, पूरक आणि नैसर्गिक आहार घ्यावा. फास्ट फूडपासून दूर राहणे गरजेचे आहे कारण आरोग्य हीच आपली खरी संपत्ती आहे. ती संपत्ती आपली आपणच जपली पाहिजे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

## वाचक पत्रे

### अभ्यासातून घडते मुलांचे खरे व्यक्तिमत्त्व

आज अनेक घरांमध्ये एकच तक्रार ऐकू येते ''मुले अभ्यास करत नाहीत.'' सतत मोबाईल, टीव्ही पाहणे, शाळेतून घरी आल्यानंतर दप्तर बाजूला टाकून खेळायला धाव घेणे, अभ्यासासाठी वारंवार सांगावे लागणे. शालेय विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या सगळ्यांसाठी मुलांचा अभ्यास ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. परंतु केवळ पुस्तकासमोरील वेळ म्हणजेच अभ्यास, अशी संकुचित व्याख्या करणे योग्य ठरेल का? अभ्यास हा केवळ वही-पुस्तकांपुरता मर्यादित नसून तो एक निरंतर चालणारी शिकण्याची प्रक्रिया आहे. विद्यार्थी जेव्हा घरातून शाळेकडे निघतो, तेव्हा तो आजूबाजूचा परिसर पाहतो, लोकांचे वागणे निरीक्षण करतो, विविध आवाज ऐकतो हे सर्व त्याचेच एक प्रकारचे अप्रत्यक्ष शिक्षण असते. अवांतर वाचन, आवडीची गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे, बाजारात खरेदी करताना पैशांचा हिशेब करणे, सुंदर चित्रे काढणे, खेळात तलीन होणे, एखाद्या विषयावर निबंध लिहिणे, दैनंदिनी लिहिणे, गणिती उदाहरणे सोडवणे, कुंडीत झाड लावून त्याचे निरीक्षण करणे, अन्नाची नासाडी टाळणे, पाणी व वीज वाचवणे, परिसर भेटी करणे या सर्व क्रियाकलापांतूनही मुलांचे शिक्षण घडत असते. अशा विविधांगी अभ्यासातून मुलांमध्ये मूलभूत शैक्षणिक कौशल्ये, भाषिक व गणितीय क्षमता, तर्कशक्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, समयसूचकता, निर्णयक्षमता, हजरजबाबीपणा, नेतृत्वगुण आणि संवाद कौशल्ये विकसित होतात.

जर अभ्यासात नावीन्य, खेळाधारित उपक्रम आणि मेंदूला चालना देणारे आनंददायी अनुभव असतील, तर मुले तो अभ्यास आवडीने करतात. कोणतीही गोष्ट मनापासून केली तर तिचे फळ निश्चितच चांगले मिळते. म्हणूनच, मुलांच्या अभ्यासाकडे केवळ 'पुस्तकातील धडे' म्हणून न पाहता, त्यांच्या दैनंदिन जीवनातील प्रत्येक शिकण्याच्या संधीला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. अशा पद्धतीनेच आपण अभ्यासातून मुलांचे व्यक्तिमत्त्व घडवू शकतो.

**अरुण सोपानराव कराळे**/९०९६३२६२७२

## आजचे संघगीत-९२

सोमवार, २४ नोव्हेंबर २०२५

### अपुल्या ध्येयावरी असू दे दृष्टि तुझी रे पुरी

अपुल्या ध्येयावरी असू दे दृष्टि तुझी रे पुरी ॥धृ.॥

प्रवास करिता आयुष्याचा मार्गी तव रे बागबगीचा
सुगंध आणिक रंग फुलांचा भुरळ पाडिती जरी ॥१॥

असंख्य पर्वत तुझ्याभोवती अथांग सागर जरी खवळती
तनू थरारुनि तुझी टाकिती धीर मनी रे धरी ॥२॥

मार्गी कंटक तुला बोचतिल ठेचा तैशा अनेक बसतिल
प्रसंग नाना निराश करतिल भिऊ नको तू परी ॥३॥

मार्गी तुजला मिळेल सोबत आक्रम मार्ग तयासमवेत
जरी गळाली मार्गी संगत थांबु नको तू तरी ॥४॥

थकशिल रस्त्यामधे चालुनी हिंमत परि अंगांत आणुनी
निजध्येयाला देव मानुनी ठेवि भाव त्यावरी ॥५॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### पालम तालुक्याचे तहसिलदार कैलासचंद्र वाघमारे यांचे कौतूक



**पालम,/प्रतिनिधी :** पालम तालुक्यामध्ये मागील काही महिन्यापूर्वी झालेली अतिवृष्टी अनुदाना साठी अँग्रीस्टक उपक्रमा अंतर्गत फार्मरआयडी नोंदणी राज्यशासनाने बंधनकारक केलीली आहे. यामुळे पालम तालुक्यातील शेतकरी फार्मर आयडी मुळे अनुदान पासुन वंचित राहिलेली होते फॉर्मर आयडी नोंदणीसाठी पालमच्या तहसिलदारची मान्यतेची आवकता मुळे ती प्रमाणित होत असते. तहसीलदार वाघमारे हे काही खाजगी कारणास्तव दोन महिन्यापूर्वी रजेवर असलेल्या मुळे पालम तालुक्यातील मोठ्या प्रमाणात शेतकरी अतिवृष्टी अनुदानापासून वंचित राहिले होते परंतू काही दिवसापूर्वी कर्तव्यदक्ष तहसीलदार रुजू होताच पालम तालुक्यात ही सुमारे ५००० च्या वर फॉर्मर नौदणी तहसिलदार यांच्या मान्यतेसाठी प्रलंबित होते. परंतू नोव्हेंबर पहिल्या आठवड्यात रुजू होताच तहसिलदार कैलासचंद्र वाघमारे यांनी शेतकऱ्याच्या या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयाला प्रथम प्राधान्य देत सुमारे पाच हजार नोंदणीस मान्यता दिली आहे. यामुळे अनुदानापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून ज्यां शेतकऱ्याच्या नाव मधे बदल झालेला असून ज्यांच्या दुरुस्त्या करायच्या आहेत अशा फॉर्म आयडी आता अंदाजे सातशेच्या वर फार्मर आयडी नोंदणी तहसीलदार यांच्या मान्यतेसाठी प्रलंबित असून, ज्यांच्या नावात मोठ्या प्रमाणात विसंगती आहेत अशा शेतकऱ्यांनी आपले आधार कार्ड घेऊन तहसिल कार्यालयात हजर राहावे, असे आव्हान तहसिलदार कैलासचंद्र वाघमारे यांनी तालुक्यातील शेतकऱ्याला केले आहे. यामुळे अनुदापासून वंचीत राहिलेल्या शेतकऱ्यांना फार्मर नोदणीला प्रथम प्राधान्य दिल्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या फॉर्मवर आयडीला प्रथम तहशिलदार याचे शेतकरी व नागरीकाच्या वतीने कौतुक करण्यात आले आहे.

### मानवत शहरातील या ३५ मतदान केंद्रावर सुज्ञमतदार बजावणार आपला पवित्र मतदानाचा हक्क

**मानवत,/प्रतिनिधी :**मानवत नगर परिषदेच्या निवडणूकीचे बीगूल वाजल्या पासून निवडणूक विभागाच्या वतीने मतदारांच्या मतदाना संबंधीच्या सर्व तयारीनीशी निवडणूक विभाग सज्ज झाला असल्याने निवडणूक प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक अधिकारी व निवडणूक विभागातील सर्व कर्मचारी यांनी जय्यत तयारी केली आहे.

प्रभाग क्र ०१ जि.प.प्रा.शा.शाखा क्र ४ खोली क्र ०१ ते ०३ प्रभाग क्र ०२ जि.प.प्रा शाळा बौध्दवाडा खोली क्र.०१ ते ०३ , प्रभाग क्र ०३ जि.प.प्रा शाळा खोली क्र. ०१ ते ०२ , नेताजी सुभाष प्राथमिक शाळा पेठ मोहल्ला खोली क्र. ०३ ,क्षेत्रिय समाज सामाजीक सभागृह खोली क्र. ०४ ; प्रभाग क्र ०४ जि.प.प्रा. शा.नविन इमारत खोली क्र ०१ ते ०२ , जूनी ईमारत खोली क्र ०३, प्रभाग क्र. ०५ जि.प.कन्याशाळा देवीमंदीर खोली क्र. ०१ ते ०३ , प्रभाग क्र ०६ ए.पी.जे अब्दूल कलाम ऊर्दू प्रा.शाळा खोली क्र. ०१ ते ०३ , प्रभाग क्र ०७ जि.प.कें.प्रा.शाळा खोली क्र. ०१ ते ०४ , प्रभाग क्र.०८ गालीब नगर इकरा ऊर्दू प्रा. शाळा. खोली क्र. ०१ ते ०३ , प्रभाग क्र ०९ नेताजी सुभाष विद्यालय ०१ ते ०३ , प्रभाग क्र.१० शकूंतलाबाई कांचनराव कत्रूवार विद्यालय खोली क्र.०१ ते ०३ , प्रभाग क्र. ११ औद्योगिक प्रशिक्षण संस्था खोली क्र. ०१ते ०३ अशा एकूण ३५ मतदान खोली (कक्षा ) मध्ये पूरूष १६३५६ तर महिला १६२४३ असे मिळूण ३२५९९ एकूण मतदार आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावणार आहे.

### नगरपालिका निवडणूक : रात्र थोडी सोंगे फार..!

#### निवडणूक रिंगणातील प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांसमोर अल्पावधीतच प्रचारयुध्दासह मतदारांना आकर्षित करण्याचे कडवे आव्हान

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सातही नगरपालिका अंतर्गत नगराध्यक्ष पदासह सदस्य पदाच्या लढतीचे शुक्रवारी उमेदवारी अर्ज माघारीनंतर पूर्णतः चित्र स्पष्ट झाले असून आता अवघ्या दहा दिवसात प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांना आपआपल्या कार्यक्षेत्रात प्रचारासह प्रचंड वातावरण निर्मिती अन् डोअर टू डोअर संपर्क साधून मतदारांना आकर्षित करण्याचे कडवे आव्हान उभे राहीले आहे. या जिल्ह्यात सातही पालिकांतर्गत नगराध्यक्षासह सदस्य पदाच्या निवडणूका या अत्यंत चूरशीच्या अन् प्रतिष्ठेच्या ठरणार आहेत. त्याचे कारण, स्थानिक नेतेमंडळींचे राजकीय अस्तित्व त्यावरच पूर्णतः अवलंबून आहे. त्यामुळेच स्थानिक नेतेमंडळींनी स्थानिक पातळीवरील आपआपल्या कार्यक्षेत्रातील जाती-पातीची, धर्माची किंवा अन्य स्तरावरील समिकरणे जूळावीत अन् हमखास यश पदरात पडावं या दृष्टीने मोर्चेबांधणी केली. सोयीच्या खेळ्या खेळल्या अन् यशस्वीरीत्या तडजोडी करीत निवडणूकीच्या रिंगणात या स्थानिक नेतेमंडळींनी कुटूंबियांसह गोतावळ्यातील किंवा सक्षम अशा कट्टर समर्थकांना रिंगणात उतरविले. त्या पाठोपाठ स्वकीयांसह मित्रपक्ष व विरोधकांच्या पडद्यावरच्या अन् पडद्याआडच्या खेळ्या ओळखून या स्थानिक नेतेमंडळींनी व रिंगणातील इच्छुकांनी मोठ्या प्रमाणावर उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या हौशा-नवशांसह अडचणीच्या उमेदवारांना रिंगणाबाहेर काढण्याकरीता तातडीने हालचाली केल्या.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# राष्ट्रवादीला मत म्हणजे सर्वांगीण विकासाला मत-उपमुख्यमंत्री पवार

## सबीया बेगम यांनी शहरात हिंदू मंदिर उभारण्यास दिले प्राधान्य-मा.आ. विजय भांबळे

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने कधीच विकासात राजकारणात न करता फक्त विकास केलेला आहे. आमच्या हाती सत्ता द्या विकास झाला निधी मी कमी पडू देणार नाही. शहराचा विकास कसा असतो हे आपण बारामतीकडे पाहिल्यास समजेल शहरातील दादा शरीफ चौकात आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरपालिका निवडणुका निमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जाहीर सभेत ते बोलत होते. या सभेस शहरातून उत्स्फूर्त प्रतिसाद भेटलेला दिसून आला.

अजित पवार यांनी असेही आपल्या भाषणात पुढे सांगितले की दिवंगत कपिल फारूखी नेहमी काम घेऊन येत असेल असा उजाळा दिला. आम्ही सर्व समाजाला डोळ्यापुढे ठेवून विकास पूर्णत्वाकडे नेतो असे स्पष्ट केले. सर्वधर्मसमभाव सेक्युलर भावना ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची कार्यपद्धती असल्याचे सांगितले.

सध्या आपल्याकडे दाखल होत असलेल्या एकतर्फी खोट्या केसेस असे भविष्यात होता कामा नये. आदर्श आचारसंहिता ही सर्वांसाठी सारखी असावी असा अंगुली निर्देश स्थानिक प्रशासनास केला. मी शब्दाचा पक्का आहे मी शब्द कधी फिरवत नाही. राजेश विटेकरला शब्द दिला होता आमदार करेल मी करून दाखवलं निशब्द फिरवत नाही. अल्पसंख्यांक इद्रिस यांना आमदार केले. आपली अल्पसंख्यांक एकजूट दाखवा सबिया भाभीच्या मत विभागणीसाठी जो तिसरा उभा आहे त्याचे डिपॉझिट जप्त करा असे आव्हान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आवर्जून केले. शेवटी राष्ट्रवादी पक्षांच्या पंचवीस नगरसेवकांना व नगर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सबीया भाभीना भक्कम साथ देत जिंतूर शहरांच्या सर्वांगीण विकास साठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला भरघोस मतदान करा असे आवाहन अजित पवार यांनी केले.मा.आ. विजय भांबळे यांनी ज्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात स्थानिक नगरपालिकेची सत्ता होती त्यावेळी शहरातील सर्वांगीण विकास केल्याचे भांबळे यांनी नमूद केले. स्वच्छ




पाणी शहरातील अंतर्गत रस्ते नाल्या, दिवाबत्ती शहराच्या सुंदरतेत भर टाकणारी मार्गावरील हॅलोजन लाईट, सबीया भाभी यांनी कुठेही हिंदू मुस्लिम ही भावना मनात न ठेवता हिंदूंची १५ मंदिरे शहरात बांधली. दलित बांधवांसाठी चांगल्या दर्जाचे बौद्ध विहार बांधण्यात आले. यावरून सांगावे लागेल. भविष्यात पुन्हा शादी खाना व सर्वसामान्य नागरिकांसाठी एक भव्य मंगल कार्यालय तसेच सांस्कृतिक भवन आदी विकास करण्याचा मनोदय विजय भांबळे यांनी व्यक्त केला. कारण सध्या शहरात असलेले खाजगी मंगल र्यालयास दीड ते दोन लाख रुपये असे फीस घेतात. जो र्वसामान्य मुलीचे आई-वडील देऊ शकत नाही. ही खंत भांबळे यांनी व्यक्त केली. निवडणुका आल्या की आश्वासनाला व पैशाला बळी न पडता विकासाला मत द्या असे विजय भांबळे यांनीमत व्यक्त केले.कारण सध्या शहरात असलेले खाजगी मंगल कार्यालयास दीड ते दोन लाख रुपये असे फीस घेतात. जो सर्वसामान्य मुलीचे आई-वडील देऊ शकत नाही. ही खंत भांबळे यांनी व्यक्त केली. निवडणुका आल्या की आश्वासनाला व पैशाला बळी न पडता विकासाला मत द्या असे विजय भांबळे यांनी मत व्यक्त केले. सुरेश नागरे व मी वेगवेगळे विधानसभेला उभे होतो. आम्ही एकत्र असतो तर चित्र वेगळे असते कारण आमच्या दोघांच्या मतांची संख्या एक लाख ८१ हजार आहे. हिंदूंना मते मागणाऱ्यांनी या पूर्वी हिंदूचीच सात दुकाने पाडून त्यांना रस्त्यावर आणले. एका मुस्लिम बांधवांचे सामान सुद्धा बाहेर काढू न देता त्याचेही दुकान पाडले. हे विकासाचे राजकारण आहे का असा प्रति प्रश्न विजय भोंगळे यांनी विरोधकांना केला. शेवटी अध्यक्षपदाचे दावेदार बाळासाहेब भांबळे यांनी माघार घेतल्याबद्दल त्यांचे भरसभेत कौतुक सुद्धा केले. अध्यक्षपदाच्या उमेदवार सभी या कपिल भारतीय यांनी आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत केलेला विकास कामांची माहिती सांगत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला मतदान करण्याचे आवाहन केले व आपल्या भाषणात भाषण करताना गहिवरून आल्याचे दिसून आले. सुरेश नागरे यांनीही आपल्या भाषणात राष्ट्रवादीला सत्ता द्या राज्याचे मुख्यमंत्री अजित दादा पवार विकास निधीची कमतरता पडू देणार नाही असे आपल्या भाषणात सांगितले. शहरातील अपेक्षित विकास पूर्णत्वाकडे नेण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी करेल असा आशावाद सुरेश नागरे यांनी व्यक्त केला. अजित पवार यांनी आपल्या शहरातील दौऱ्या दरम्यान सुरेश नागरे यांच्या निवासस्थानी भेट दिली यावेळी त्यांचे औक्षण अम्रता नागरे यांनी केले. या वेळी सुरेश नागरे लक्ष्मण बुधवंत, प्रेक्षा भांबळे संतोष आंधळे यांची उपस्थिती होती.

## अखेर माजी नगरसेक पठाण मज्जिद खा यांचा भाजपत प्रवेश

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** सुरेश नागरे यांचे कट्टर समर्थक माजी नगरसेवक पठाण मज्जिद खा साहेब व निवडणूक रिंगणात इच्छुक असलेले त्यांचे सुपुत्र पठाण वसीम खान मस्जिद खान यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे सुरेश नागरे यांच्याकडून उमेदवारी न भेटल्याने नाराजी व्यक्त करत चक्क निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये प्रवेश घेऊन प्रभाग चार मध्ये भाजपचे नगराध्यक्ष उमेदवार प्रताप देशमुख व उभे असलेले दोन भाजप नगरसेवकांना प्रभाग चार मधून भरघोस मतांनी निवडून आणण्याचे अभिवचन पठाण मजीद खा यांनी दिले.

माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनात



माऊली मंगलकार्यालयात संपन्न झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत प्रवेशा दरम्यान बोलताना त्यांनी जगजाहीर केले. एकूणच माजी नगरसेवक पठाण मज्जिद खा व त्यांचे सुपुत्र वसीम यांच्या भाजप प्रवेशाने प्रभाग चार मध्ये भाजपला भक्कम मजबुती नक्कीच भेटणार असे चित्र स्पष्ट होताना दिसून येत आहे. या प्रवेशादरम्यान अध्यक्ष पदाचे उमेदवार प्रताप देशमुख ओबीसी नेते नानासाहेब राऊत माझी जि.प.सदस्य प्रसाद बुधवंत व भाजप पदाधिकारी कार्यकर्ते व उमेदवार मोठ्या प्रमाणात या कार्यकर्ता बैठकीत उपस्थित होते.

## गंगाखेड येथे जिल्हास्तरीय कुराश स्पर्धा उत्साहात संपन्न

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** श्री संत जनाबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,गंगाखेड येथे (दिनांक २२ नोव्हेंबर शनिवार) रोजी शालेय जिल्हास्तरीय विनाअनुदानित कुराश स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. जिल्ह्यातील अनेक शाळा व महाविद्यालयांनी मोजक्या संख्येने सहभाग नोंदवत स्पर्धेला प्रतिसाद दिला.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा क्रीडा संचालक डॉ.चंद्रकांत सातपुते, जिल्हा कुराश संघटनेचे सचिव कल्याण मुरकुटे, प्रा.विजय बेरळीकर,प्रा.प्रताप सिसोदे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. ही स्पर्धा महाराष्ट्र युवक सेवा संचालनालय,पुणे,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,परभणी,जिल्हा कुराश संघटना परभणी आणि श्री संत जनाबाई महाविद्यालय गंगाखेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.यामध्ये श्री संत जनाबाई महाविद्यालयाने तब्बल आठ सुवर्णपदके पटकवत विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. तसेच सरस्वतीबाई भाले विद्यालय, मानवत येथील दोन विद्यार्थी व महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय, कोद्री येथील एका विद्यार्थिनीने सुवर्णपदक पटकावत विभागीय स्तरासाठी निवड निश्चित केली. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थाचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य ,उपप्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य, कार्यालयीन अधीक्षक, परभणी जिल्हा कुराश संघटना ,तसेच सर्व प्राध्यापक वृंदांनी शुभेच्छा दिल्या.

## पालम येथील गोपीनाथ नामदेव रोकडे काही दिवसापासून बेपत्ता

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** दि ७ नोव्हेबर रोजी शुक्रवारी पालम येथिल



गोपिनाथ नामदेव रोकडे वय ६५ रा.पालम हे घरुन आळदिच्या यात्रेस जाऊन येतो असे सागुन घरून गेले आहेत.

आज पर्यत घरीन आल्याने घरातील मडळीनी पाहुणे यांच्या कडे विचारणा केली तसेच आळदिहुन येणाऱ्या गावातील नागरीकाना विचारणा केली आहे. त्यान न दिसल्या मुळे पालम पोलीस स्टेशन येथे त्याच्या मुलाने मिसिग दाखल केलीआहे.कोनाला भेटल्यास त्याच्या मूलाच्या मो.नबर ७७९६७४४६२४ वर किवा पालम पो. स्टेशन येथे संपर्क साधावा असे आवाहनही यावेळी करण्यात आले होते.

## भारतीय जनता युवा मोर्चा मानवत यांच्या वतीने कॉफी विथ युथ उपक्रम

**मानवत,/प्रतिनिधी:** दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी 'कॉफी विथ युथ' हा तरुणांशी संवाद साधणारा उपक्रम उत्साहात पार पडला. आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने नवयुवक मतदारांशी थेट संपर्क साधत त्यांच्या समस्या व अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला .



तरुणांसमोरील प्रश्न, विकासाची गरज, युवा धोरण आणि शहराच्या भविष्यासंदर्भात विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. कार्यक्रमात उपस्थित तरुणांनी आपल्या अपेक्षा मांडल्या. यावर महायुतीचे मानवत नगराध्यक्षपदाचे उमेदवार महेश कोकर यांनी समाधानकारक उत्तरे देत नगरपालिकेच्या भविष्यातील विकासाचे आपले विजन स्पष्टपणे मांडले. आगामी काळात मानवत शहराचा सर्वांगीण व आधुनिक विकास करण्यासाठी ठोस भूमिका मांडून त्यांनी तरुणांचे मनोगतही जाणून घेतले.


या प्रसंगी भाजपा.युवा ग्रामीणचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर धोपटे, प्रभाग क्रमांक १० चे भाजपा उमेदवार अनंतराव गोलाईत, राजेश मंत्री, श्रीकांत देशमुख, भाजपा जिल्हा सरचिटणीस अभिजीत उन्हाळे, तालुका उपाध्यक्ष अमोल कुऱ्हाडे, तालुका सरचिटणीस गणेशजी भरड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला मानवत शहरातील नवयुवक मतदारांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभून उपक्रम यशस्वी झाला.

## जिल्हयात शिवशाहीची अवस्था मोडकळीस, आगार प्रमूखांचे दुर्लक्ष

### खराब शिवशाही बस मधून प्रवाशांना करावा लागतो जीवघेणा प्रवास, त्या सोयी काय कामाच्या

**मानवत ,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने आपल्या लालपरीच्या ताफ्यात अनेक नविन नविन सेवा सुविधानी सूसज्ज असलेल्या अशा नविन बसेस दाखल करून घेतल्या त्यामूळे घाट्यात जाणारे महामंडळ आज नफ्यात चालत आहे. पण व्यवस्थापणाचे याकडे दूर्लक्ष होत असल्याने आज शिव शाही ही अखेरची घटका मोजत आहे.

त्यामूळे नाहक प्रवांशांना जादा भाडे देऊन ही त्रास सहन करण्याची पाळी आली असल्याने बीड परभणी महामार्गावर धावणाऱ्या सर्व शिवशाही बसेस थांबवून साध्या गाड्या वाढवाव्यात अशी मागणी त्रस्त प्रवाशांमधून होत आहे. सविस्तर वृत्त असे की, परभणी आगाराची शिवशाही ही बीड, पाथरी वरून परभणी कडे जाण्यासाठी मानवत बसस्थानकात आली. त्यावेळी अनेक प्रवाशी चढले पण गाडी ना दूरूस्त असल्याची ओरड चालक हे




करीत असून ही जाण्याच्या गरबडीत काही प्रवाशी बस मध्ये चढले व प्रवासाचे १०५ रूपये भरून टिकिट घेतले पण शहरापासून एक किलो मिटर अंतरावर बस खराब झाल्याची सूचना चालकांनी देऊन २५/३० प्रवाशांना साध्या गाडीत बसून देण्याची पाळी वाहकावर आली. याचा त्रास चालक व वाहक यांना सुध्दा भोगावा लागला. नादूरूस्त गाड्यामुळे विनाकारण प्रवांशांना जादा भूर्दंड व मानसीक मनस्ताप सहन करावा लागला. आगार प्रमूख यांनी लक्ष देऊन शिवशाही बसेस ची झालेली दैणिय अवस्था लक्षात घेऊन या मार्गावरून धावणाऱ्या बसेस कायम बंद कराव्यात अशी मागणी प्रवांशा मधून होत आहे. दरम्यान या बससेना आपल्या कार्यकाळात आपल्या सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी महामंडळाकडे मागणी करण्याची मोठी गरज आहे असे झाल्यास प्रवाशांना सुविधा मिळतील.

# अखेर लिंबागणेश-पोखरी-पालवण रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती सुरू

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ नोव्हेंबर**

तत्कालीन ग्रामविकास मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने आणि जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या पाठपुराव्यामुळे तब्बल १३ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या पालवण ते लिंबागणेश या २४ किमी रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर सर्वत्र पडलेले खोल खड्डे व भगदाडांमुळे नागरिक, शेतकरी, विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. अपघातांचे प्रमाणही वाढले होते.

गेल्या आठवड्यात ग्रामस्थांनी खड्ड्यांमध्ये बेशरमाची झाडे लावून प्रशासन आणि कंत्राटदाराचा निषेध नोंदविला होता. दरम्यान मदन मस्के कन्स्ट्रक्शन, बीड यांनी दुरुस्ती कालावधी संपल्याचे कारण देत जबाबदारी नाकारली होती.या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चातून रस्त्यावरील खड्ड्यांचे तात्पुरते डांबरीकरण सुरू केले असून ग्रामस्थांनी या उपक्रमाचे स्वागत करत त्यांचे आभार मानले आहेत.आहेर-धानोरा-वरवटी-लिंबागणेश हा महत्त्वाचा दळणवळणाचा रस्ता अतिवृष्टीमुळे अत्यंत खराब स्थितीत आला होता. खोल खड्डे, पाण्याचे साचलेले तळ, नष्ट झालेले पृष्ठभाग यामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले.शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्याने ग्रामस्थांच्या दैनंदिन गैरसोयी लक्षात घेऊन स्वखर्चाने दुरुस्तीकार्य सुरू केल्याचे मस्के यांनी सांगितले.बीड जिल्ह्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जाचे रस्तेकाम होत असल्याचे प्रत्यक्ष पाहायला मिळते.रस्त्यावरील कामाचा बोर्ड आणि वास्तविक स्थिती यामध्ये मोठी तफावत आहे. अनेक ठिकाणी बोर्डावर रस्ता दोन वर्षांपूर्वीच झाल्याचे नमूद असूनही प्रत्यक्षात रस्त्याची अवस्था अत्यंत खराब आहे. कंत्राटदार दुरुस्ती कालावधीतील तफावतीचा गैरफायदा घेत कालावधी संपला असे सांगून जबाबदारी झटकत असून ग्रामस्थांची व शासनाची दिशाभूल करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला. ग्रामस्थांनी सजग राहून अशा कामांवर देखरेख ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले.



# तुलसी शैक्षणिक समूहाची आंतरराष्ट्रीय झेप

## वेलनेस आणि ब्युटी शिक्षणासाठी कोरियन वेलनेस नेटवर्कसोबत ऐतिहासिक करार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ नोव्हेंबर**

मराठवाड्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तुलसी शैक्षणिक समूहाने वेलनेस आणि ब्युटी शिक्षण क्षेत्रात जागतिक सहकार्याची दिशा दाखवणारे महत्त्वपूर्ण पाऊल टाकत दक्षिण कोरियातील कोरियन वेलनेस नेटवर्क सोबत लेटर ऑफ इंटरेस्ट (एलओआय) वर स्वाक्षरी करून जागतिक दर्जाच्या संयुक्त शिक्षण कार्यक्रमांचा मार्ग मोकळा केला आहे.

विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारा हा महत्त्वपूर्ण करार रविवार, दि.१६ रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे संपन्न झाला. या वेळी कोरियन प्रतिनिधी म्हणून कोऑपरेटिव्ह एम्प्लॉयमेंट मूव्हमेंट नॅशनल मुख्यालय, सियोलचे चेअरमन चोई यंग हो, कोरियन बुद्धिस्ट युनिव्हर्सिटीचे व्हाईस चान्सलर आणि प्रख्यात धम्माचार्य डॉ. ली ची रान तसेच



वर्डेस्क स्ट्रॅटेजी प्रा.लि., पुणेचे सल्लागार आयु. नितीन साळवे उपस्थित होते. तुलसी एज्युकेशनल इन्स्टिट्यूटतर्फे प्रा.प्रदीप रोडे यांनी प्रतिनिधित्व केले.

करारानंतर चेअरमन चोई यंग हो यांनी भारतीय विद्यार्थ्यांना कोरियन वेलनेस-ब्युटी उद्योगातील उच्च दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. ली ची रान यांनी, या उपक्रमामुळे भारत-दक्षिण कोरिया शैक्षणिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ होतील, असे मत व्यक्त केले. तर प्रा. प्रदीप रोडे यांनी, या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय इंटर्नशिप, प्रगत कौशल्यविकास आणि जागतिक रोजगाराच्या संधी अधिक व्यापक होतील, असे नमूद केले.


या संपूर्ण प्रकल्पाचा समन्वय आयु.नितीन साळवे यांच्या माध्यमातून करण्यात आला. या महत्त्वाच्या क्षणी तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा आयु. दीपा रोडे, डॉ. प्रियांका रोडे, इंजि. दीपंकर रोडे तसेच समूहातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजपिंपरी येथे संत सखाराम महाराज पुण्यतिथी सोहळा उत्साहात

## धर्म म्हणजे कर्तव्य, धार्मिकता नव्हे-भाऊसाहेब महाराज जोशी

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२४ नोव्हेंबर**

मनुष्याला चार पुरुषार्थ प्राप्त करता येतात पशु योनीत फक्त काम नावाचा पुरुषार्थ बलवान असतो मनुष्याला फक्त धर्म नावाचा पुरुषार्थ बलवान करता आला की मोक्ष हे त्याचे फलच आहे.आज मनुष्यामध्ये धर्म म्हणजे कर्तव्य कमी होत असून फक्त धार्मिकता वाढत आहे असे प्रतिपादन भागवताचार्य भाऊसाहेब महाराज जोशी यांनी राजपिंपरी येथे भागवत कथेत बोलताना व्यक्त केले.



गेवराई तालुक्यातील राजपिंपरी येथे श्री.संत सखाराम महाराज पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दि.१७ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर या कालावधीत भजन, कीर्तन, श्रीमद् भागवत कथा तसेच ज्ञानेश्वरी पारायण अशा भव्यदिव्य स्वरुपात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तर पुढे बोलताना भाऊसाहेब महाराज जोशी म्हणाले की, मनुष्याने पुण्य होण्यासाठी परमार्थ करु नये तर परिवर्तन होण्यासाठी परमार्थ करावा प्रत्येक व्यक्तीला बदललेला संसार आवडतो त्याप्रमाणे आपल्याला आपल्यामध्ये बदललेल्या संस्काराचे खरी गरज आहे संस्कार हे संसाराचे सुरक्षा कवच आहे असे मौलिक विचार यावेळी बोलताना त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला साथ संगत श्रीमंत महाराज बोराडे, आत्माराम महाराज भिताडे ,गोविंद महाराज मुळे, राम महाराज मुळे, भक्ती शक्ती वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी व राजपिंपरीचे भजनी मंडळ, गुणीजन मंडळ, गोविंद महाराज शिंदे, चोपडे महाराज, मेखले महाराज, साबळे महाराज, विठ्ठल महाराज सह आदी तरुण मंडळ तसेच महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राजपिंपरी येथे उद्या होणार संत सखाराम महाराजांचा भव्य रथोत्सव

गेवराई तालुक्यातील राजपिंपरी येथे प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री संत सखाराम महाराज पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दि.१७ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या सोहळ्यात सोमवार दि.२४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते १२ दरम्यान सद्गुरू पु. प्रज्ञा चक्षु मुकूंदकाका (जाटदेवळेकर) यांचे काल्याचे किर्तन होईल व नंतर दुपारी १२ वा. संत सखाराम महाराज यांचा भव्य रथोत्सव व त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ राजपिंपरी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बदामराव व बाळराजेंच्या लोकमान्य युतीमुळे गेवराई शहरात गीताभाभी पवार सर्वांना भारी!

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२४ नोव्हेंबर**

गेवराई नगर परिषदेच्या निवडणुकीत सर्वसामान्य जनतेला आवडलेल्या बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांच्या लोकमान्य युतीमुळे भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार सौ. गीताभाभी पवार या सर्वांना भारी ठरत असल्याचे चित्र शहरात सर्वत्र पहावयास मिळत आहे.भाजपामधील प्रवेशानंतर पंडित-पवारांचे मनोमिलन झाल्यामुळे दोन्ही नेत्यांचे कार्यकर्ते व जनतेमध्ये उत्साह संचारला असून गीताभाभींना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्यासाठी पंडित परिवारासह त्यांचे कार्यकर्ते रात्रंदिवस झटत आहेत.

गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या सन २०१४ मध्ये झालेल्या निवडणुकीच्या वेळी गेवराईचे बदामराव पंडित आणि बीडचे अमरसिंह पंडित परिवारात राजकीय युती झाल्याने या अभद्र युतीबद्दल बदामरावांच्या कार्यकर्त्यांसह जनतेमध्ये तीव्र नाराजी पसरून संतापाची लाट निर्माण झाली होती. या नाराजीचा फटका बदामराव पंडितांना बसला आणि या निवडणुकीत ते तब्बल ६० हजारांच्या प्रचंड मताधिक्याने पराभूत झाले होते. त्यामुळे बीडच्या धुर्त पंडितांनी गेवराईच्या सरळ स्वभावाच्या पंडिताला जवळ घेऊन त्यांचा राजकीय अडसर दूर केला, अशी भावना बदामराव पंडित यांच्या कार्यकर्त्यांसह जनतेत निर्माण झाली होती. गेवराईच्या पंडितांनी बीडच्या पंडितांशी केलेली अभद्र युती बदामराव पंडितांच्या कार्यकर्त्यांसह जनतेला अजिबात आवडली नव्हती. त्याची जबर किंमत बदामरावांना विधानसभेच्या निवडणुकीत मोजावी लागली होती.

# अतिक्रमण धारकांना खरा न्याय लक्ष्मण आण्णांनी चार वर्षांपूर्वीच दिला - शेख शब्बीरभाई

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२४ नोव्हेंबर**

शहरातील संजयनगर, साठेनगर, संघमित्रनगर, इस्लामपुरा, अचानकनगर परिसरातील अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या अतिक्रमण धारकांच्या हक्कांसाठी लक्ष्मण आण्णा पवार यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांची यशस्वी फलश्रुती आज सर्वांना दिसत असल्याचे मत शेख शब्बीरभाई यांनी व्यक्त केले.

सन २०१२ मध्ये लक्ष्मण आण्णा नगराध्यक्ष असताना अतिक्रमण धारकांना हक्काचा पीटीआर मिळावा म्हणून त्यांनी २१ सप्टेंबर रोजी मोठा मोर्चा काढला होता. हजारोंच्या उपस्थितीत झालेल्या या आंदोलनाची दखल घेत तत्कालीन जिल्हाधिकारी सुनील केंद्रेकर यांनी थेट लक्ष्मण आण्णांशी संपर्क साधत उपविभागीय अधिकारी संतोष राऊत व पी.आय. हनुमंत गायकवाड यांच्या उपस्थितीत आंदोलकांना आश्वासन देत मोर्चा थांबवला होता.

यानंतर लक्ष्मण आण्णांनी अतिक्रमण धारकांसाठी पाठपुरावा सुरूच ठेवला. २०१४ मध्ये ते आमदार म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर पीटीआरचा विषय ठामपणे मांडला. २०१६ मध्ये गेवराई नगरपालिकेच्या लोकार्पण सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वतः अतिक्रमण धारकांना हक्काचे पीटीआर देण्याचे आश्वासन दिले.

# प्रभाग क्रमांक २ मध्ये नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी व उमेदवारांच्या प्रचारार्थ रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ नोव्हेंबर**

नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.पदमश्री बाजीराव धर्माधिकारीव प्रभाग क्रमांक २ मधील अधिकृत उमेदवार सौ. कविता अनंत इंगळे तसेच उमेदवार अल्ताफ पठाण यांच्या प्रचारार्थ भव्य रॅली काढण्यात आली.या रॅलीला भरभरून प्रतिसाद मिळाला.



या रॅलीची सुरुवात मिलिंद नगर येथील बुद्ध विहारात तथागत गौतम बुद्धांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी,अनंत इंगळे अल्ताफ पठाण यांच्या हस्ते पुष्प अर्पण करण्यात आले. या प्रभागात ढोलताशांच्या गजरात प्रचार रॅली काढण्यात आली.या रॅलीत महायुतीचे पदाधिकारी,कार्यकर्ते,या भागातील नागरिक मोठ्या संख्येने स्वयंस्फूर्त सहभागी झाले होते.

# परळीला बदनाम करणाऱ्यांना जनता मत रूपी आशीर्वाद देऊन उत्तर देईल - धनंजय मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ नोव्हेंबर**

परळीच्या मातीतील जनतेची सेवा आणि विकास हाच आपला ध्यास ठेवून मागील अनेक वर्ष आम्ही काम करत आलो आहोत, मागील काही कार्यकाळ नगरपरिषदेत प्रशासक होता, मात्र तरीही विकास कामांसाठी निधी खेचून आणण्यात कुठेही कमी पडलो नाहीत. परंतु गेल्या काही महिन्यात राजकीय स्वार्थापोटी काही लोकांकडून परळीची राज्यात जी बदनामी करण्यात आली, तिचे चोख प्रत्युत्तर देण्यासाठी परळीतील जनता महायुतीच्या नगराध्यक्ष पदासह सर्व उमेदवारांच्या पाठीशी मतदान रोपे आशीर्वाद उभा करून भरघोस मतांनी विजयी करून देईल, असा विश्वास माजी मंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते आमदार धनंजय मुंडे यांनी परळी येथे बोलताना व्यक्त केला.

परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीच्या अधिकृत उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह युतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ आज महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा संयुक्त कार्यकर्ता मेळावा पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचे सह आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता, या वेळी श्री. मुंडे बोलत होते.

# स्मिता विष्णू वाघमारे यांना समाज बांधवांचा पाठिंबा

## बीड शहरातील आंबेडकरी समाज बांधवांच्या निर्णायक बैठकीत निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ नोव्हेंबर**

बीड नगर परिषदेसाठी मागासवर्गीयांना आलेली अध्यक्ष पदाची संधी डावणाऱ्या सत्ताधारी प्रस्थापितांना व अजित पवार गटाला धडा शिकविण्यासाठी आज रोजी हॉटेल नीलकमल नगर रोड बीड येथे बीड शहरातील आंबेडकरवादी संघटनांच्या सर्वपक्षीय पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधवांची निर्णायक बैठक घेऊन स्मिता विष्णू वाघमारे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्णय घेण्यात आला

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी जोपासत समाज बांधवांच्या न्याय व हक्कासाठी रस्त्यावर उतरून लढा उभा करण्याचे काम करणाऱ्या दलित चळवळीतील पदाधिकाऱ्यांना उमेदवारी डावलून समाजाशी



कसलीही बांधिलकी नसणाऱ्या व आयात केलेल्या उमेदवारास उमेदवारी जाहीर करून ४० वर्षानंतर आम्हाला मिळालेली राजकीय संधी हिरावून घेऊन मुस्लिम समाजाला उमेदवारी देण्याचे काम अजित पवार यांनी केले आहे.

आंबेडकरी समाज बांधवांच्या बैठकीत पप्पूजी कागदे, अजिंक्य चांदणे, बबन वडमारे,राहुल मस्के, वसंतराव ओगले, दिनकर बोराडे,अरुण सवाई, ज्ञानोबा माने, दीपक चौगुले, नितीन सोनवणे, उत्तमराव पवार, सत्यनारायण ढाका, अनुरथ वीर, मायाताई मिसळे, आम्रपाली साबळे, भगवान कांडेकर, सिद्धार्थ शिंनगारे, नितीन वाघमारे, यांच्यासह आंबेडकरी संघटनांच्या सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी स्मिता विष्णू वाघमारे यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

बीड नगर परिषदेची नगराध्यक्ष पदाची निवडणूक समाज बांधवांच्या स्वाभिमानाची निवडणूक असून मागासवर्गीय उमेदवारासाठी आरक्षित असलेल्या नगर अध्यक्षपदासाठी अनुसूचित जातीच्या समाजाच्या जागेवर आयात केलेल्या उमेदवारास उमेदवारी देऊन भू-मापिया, रेती माफिया व गुटखा माफिया यांच्या ताब्यात बीड नगर परिषद देण्यासाठी व आपल्याला संविधानाच्या माध्यमातून मिळणाऱ्या आरक्षणाच्या हक्क व अधिकारापासून वंचित ठेवण्याचे काम करणाऱ्या अजित पवार यांच्यासह अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांनी घेतलेल्या निर्णयाला नेस्तनाबूत करण्यासाठी समाजाची एकजूट महत्वाची आहे. बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत आंबेडकरी समाज बांधवांनी राजकीय ताकद निर्माण करण्यासाठी अजित पवार गटाच्या घड्याळ या चिन्हाच्या उमेदवाराला पराभूत करून, स्मिता विष्णू वाघमारे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार आंबेडकरी चळवळीतील सर्वपक्षीय पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधवांनी बैठकीत निर्णय घेवून केला.

या निर्णायक बैठकीस राजू जोगदंड, आशिष चव्हाण, भास्कर सरपते, यशवंत कदम,किसन तांगडे, सुभाष लोणके, अशोक ठोकळ, रवी वाघमारे, हनुमंतराव कांबळे,डी.जी वानखेडे, गौतम सोनवणे, प्रा. बाळासाहेब वाघमारे, प्रा. विठ्ठल गाडे, प्रा. सिरसाट, आदमाने, रमेश माटे, शाहू डोळस, नाना मस्के, महेश आठवले, अनिल बोराडे, संगीता वाघमारे, अरुणाताई आठवले, रेश्माताई जोगदंड,अनिताताई डोंगरे, शोभा गलांडे, शेख भाभी, सुभाष तांगडे, ड.सुरेश वडमारे,ड. तेजस वडमारे,ड. देवत्त शिंदे, ड. राहुल साळवे,ड. अशोक वाघमारे,ड.दीपक ससाणे, सुर्यकांत जोगदंड, मधुकर लोंढे, अशोक वीर, प्रकाश वक्ते, बंडू विसर्जन अविनाश जोगदंड प्रभाकर चांदणे, संभाजी गायकवाड, नागेश दुबळे, विलास जोगदंड, संजय हनवते, भारत कांबळे, भैय्या साळवे, गौतम धन्वे, प्रा.बाळासाहेब गव्हाणे, अक्षय कांबळे, महेंद्र वडमारे, अक्षय कोकाटे, भैय्या मस्के, रतन वाघमारे,नामदेव वाघमारे, सतीश शिनगारे, शाम वीर, गौतम कांबळे, सोनू वडमारे, यांच्यासह बीड शहरातील आंबेडकरी संघटनांचे सर्व पक्षी पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधव या निर्णायक बैठकीस हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

**काळ्या फिती तोंडाला बांधून अजित पवारांचा निषेध**

बीड नगर परिषद निवडणूकीत अजित पवार गटाने आंबेडकरी समाजाला, ऐनवेळी उमेदवारी नाकारल्याने, आंबेडकरी समाज बांधवांकडून तोंडाला, काळ्या फीती बांधनू जाहीर निषेध केला.

# परळी नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी (शरद पवार गट) आघाडीचा जोरदार प्रचार

## खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्यासह प्रमुख नेत्यांचा आज शहरात प्रचार दौरा; विविध प्रभागांत कॉर्नर बैठकांचे नियोजन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ नोव्हेंबर**

परळी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीला वेग आला असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) आणि मित्रपक्ष आघाडीने प्रचाराची आक्रमक सुरुवात केली आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.संध्याताई दिपकनाना देशमुख यांच्यासह नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पक्षाचे प्रमुख नेते मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५ रोजी परळीत प्रचार दौरा करणार आहेत. शहराच्या विविध भागांत प्रचार फेरी तर काही ठिकाणी महत्त्वपूर्ण कॉर्नर बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरात होणाऱ्या आजच्या प्रचार दौऱ्यात बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, राजेभाऊ फड (प्रदेश सरचिटणीस) आणि दीपक नाना देशमुख हे नेते विशेषतः सहभागी होणार असून, दिवसभर विविध प्रभागांमध्ये सभा आणि प्रचारफेऱ्यांद्वारे मतदारांशी थेट संवाद साधणार आहेत. सकाळी ९ वा. : प्रभाग ८ मधील प्रचार फेरी, सकाळी ११ वा. : प्रभाग ७ व ८ येथील संयुक्त सभा, सायं. ५ वा. : प्रभाग १ व ९ मधील प्रचार फेरी, सायं. ७ वा. : प्रभाग १ व ९ येथील संयुक्त सभा याप्रमाणे आजच्या प्रचार फेरी आणि कॉर्नर बैठकांचे नियोजन करण्यात आल्याची माहिती प्रचार समितीकडून देण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पार्टी) आणि मित्रपक्ष आघाडीतर्फे या दौऱ्यात हजारोंच्या संख्येने कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. परळीच्या विकासाचा नवा रोडमॅप, लोककल्याणाचे आश्वासन आणि स्थानिक प्रश्नांवरील ठोस भूमिका या सभांमध्ये मांडली जाण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. परळी नगरपरिषद निवडणूक चुरशीची होत असून, आघाडीच्या या प्रचार दौऱ्यामुळे स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची चाहूल लागली आहे.

**निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची पक्षपाती भूमिका!**

परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर हे कोणाच्यातरी दबावाखाली किंवा सांगण्यावरून जाणीवपूर्वक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या उमेदवारांना वेठीस धरण्याचे काम करीत आहेत. तसेच, परळीतील इतर प्रशासन देखील, एकतर्फी पक्षपाती भूमिका घेत आहेत. याची रीतसर तक्रार राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्तांना व संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या दीपक देशमुख व व दीपक रंगनाथ देशमुख यांनी केली आहे. यामुळे परळीत प्रशासनाच्या भूमिकेबाबत नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. स्थानिक राजकारणात चर्चेला ऊत देणारी बाब म्हणजे गणेशपार येथील सभेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी परवानगी नाकारली आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांवर स्थानिक आमदार तसेच मंत्र्यांचा दबाव असल्याची जोरदार चर्चा शहरात रंगत आहे. त्यामुळे प्रशासनाची निष्पक्षता आणि निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. प्रत्यक्ष मतदान बुधवर काय परिस्थिती असेल याची यावरून कल्पना येते. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तर परळीत लोकशाही टिकून राहील किंवा लोकशाहीत निवडणुका होतील.

# मतदान अधिकाऱ्यांनी समन्वय साधून काम करावे- घुटूकडे

## नगर पालिका निवडणुक संदर्भात मतदान अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ नोव्हेंबर**
मतदान केंद्रावरील अधिकारी, कर्मचारी यांनी एकमेकांशी समन्वय साधून निवडणुकीचे काम चोखपणे करावे असे आवाहन निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी प्रशिक्षणात केले.
हिंगोली नगर पालिका निवडणुकीसाठी दि २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून यासंदर्भात नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी यांचे दि २४ नोव्हेंबर रोजी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंढे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ, नायब तहसीलदार एस के कोकरे, प्रशांत बोरसे यांची प्रमुख उपस्थिती होती.
हिंगोली पालिका निवडणुकीत प्रत्यक्ष मतदानासाठी प्रशासनाकडून तयारी केली जात आहे. मतदान प्रक्रियेसाठी शहरातील मतदान केंद्रांवर सुमारे ४०० अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण येथील कल्याण मंडपम् येथे घेण्यात आले.
यावेळी उपविभागीय अधिकारी घुटुकडे यांनी मार्गदर्शन करतांना मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांनी मतदान यंत्र व आवश्यक कागदपत्रे, साहीत्य तपासणी करूनच घ्यावे. मतदान केंद्रावर पुरेसा वीजपुरवठा असल्याची खात्री करून घ्यावी. मतदान केंद्रावर अनुचीत प्रकार घडणार नाही याची दक्षता घ्यावी. मतदान केंद्रावर गोंधळाची परिस्थिती निर्माण होत असल्याचे लक्षात येताच तातडीने पोलिस विभागाशी संपर्क साधून माहीती द्यावी तसेच बंदोबस्तावर असलेल्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना याबाबत अवगत करावे. याशिवाय निवडणुक विभागाशी ही तातडीने संपर्क साधावा. मतदानाची टक्केवारी वेळेत सादर करावी आदी सूचना उपविभागीय अधिकारी घुटुकडे यांनी दिले.
यावेळी केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना मतदान यंत्र तसेच निवडणुकीत मतदान वेळी पार पाडावयाची कर्तव्य, कामे याबद्दल सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाला ५३८ पैकी ५ कर्मचारी गैरहजर होते. गैरहजर कर्मचाऱ्यांवर निवडणुक विभाग काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आ. बांगर यांच्या पायाखालची वाळू सरकल्याने बेताल वक्तव्य

## खा. नागेश पाटील यांचा आ. बांगरांवर पलटवार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ नोव्हेंबर**
उबाठाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर शरीराने उबाठा गटात असले तरीही ते मनाने आमच्याकडे असल्याचे वक्तव्य शिवसेना शिंदे गटाचे आ. संतोष बांगर यांनी केले. या वक्तव्यावर पलटवार करीत खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी आ. संतोष बांगर यांच्या पायाखालची वाळू सरकली असून निवडणुकीच्या तोंडावर अशाप्रकारची बेताल वक्तव्य करून आमचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मतदारांमध्ये संभ्रम पसरविण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत. आम्ही उध्दव बाळासाहेब ठाकरे यांचे सच्चे शिवसैनिक आहोत असा पलटवार करीत चांगलाच समाचार घेतला.
हिंगोली नगरपालिका निवडणुकीचे वातावरण आता चांगलेच तापत असून शिवसेना शिंदे गट आणि उबाठा शिवसेना यांच्यात आता आरोप प्रत्यारोपाच्या फैरी सुरू झाल्या आहेत. शिंदे सेनाकडून रेखा श्रीराम बांगर तर महाविकास आघाडीकडून अर्चना श्रीराम भिसे हे दोन उमेदवार नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी निवडणुक रिंगणात आहेत. दोन्ही शिवसेना मोठ्या जोमाने निवडणुक प्रचार करीत असून त्यांचे नेते सभा, कॉर्नर बैठकांमधून एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करीत असतांना दिसत आहे. गट तट, बंडाळी, नाराजी नाट्यामुळे राजकीय आखाडा रंगल्याचे चित्र सध्या दिसत आहे.
दोन दिवसांपूर्वी शिंदेसेनेचे आ. संतोष बांगर यांनी प्रचारा दरम्यान खा. नागेश पाटील आष्टीकर शरीराने तिकडे मन मात्र आमच्याकडे असल्याचे वक्तव्य करीत गणित जुळले की ते शिंदेगटात प्रवेश करणार असल्याचे विधान केले होते.
यावरून शिंदे गट आणि उबाठा गटांत अस्वस्थता पसरली आहे. तर दुसरीकडे संतोष बांगर यांच्या वक्तव्यामागे कुठलीही सत्यता नसून नगर पालिका निवडणुकीत त्यांच्या पायाखालची वाळू सरकत असल्यामुळे ते भांबावल्यासारखे वक्तव्य करीत आहेत. तेच केंव्हा कोणत्या पक्षात जातील याचा भरवसा नाही. मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा हा प्रयत्न असून हिंगोलीतील मतदार सुज्ञ आहे. त्यांना माहीत आहे उबाठाची परिस्थिती शहरात चांगली असून महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट एकत्रितपणे निवडणुकीत असून महाविकास आघाडीच्या समर्थनार्थ निघालेल्या विशाल रॅलीमुळे आ. बांगरांना चांगलीच धसकी बसली आहे. उध्दव ठाकरे यांची साथ आपण कधीच सोडणार नसून विरोधकांकडून निवडणुकीच्या तोंडावर अफवा पसरविण्याचे काम सुरू असून हिंगोलीतील जनता आ. बांगरांच्या वक्तव्यांवर विश्वास ठेवणार नाही.
शिंदेसेना आणि उबाठा शिवसेना यांच्यात आता शाब्दीक युध्द सुरू झाले असून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. येत्या निवडणुकीत दोन्हीही शिवसेनेतील शाब्दीक वार पलटवार वाढतच जाणार असल्याचे चित्र दिसत आहे.

# मुलींच्या क्रिडा स्पर्धांचे जिल्हाधिकाऱ्यांच्याहस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ नोव्हेंबर**



केंद्रशासन, साई व ए. एफ. आय. यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे देशातील महिला सबलीकरण व खेळात मुलींचा सहभाग वाढावा हेतुने अस्मिता लिग ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन संपूर्ण भारतभर करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज हिंगोली येथे तालुका क्रीडा संकुलात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.
हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी माननीय राहुल गुप्ताजी यांच्या हस्ते सदर स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश मारावार, रमेश गंगावणे सचिव हिंगोली अथलेटिक संघटना, रामप्रकाश व्यवहारे संयोजक हिंगोली तालुका क्रीडा स्पर्धा, डॉ. संजय नाकाडे, शिवाजी इंगोले, दत्तरावजी बांगर, शिवाभाऊ घुगे सदस्य अथलेटिक संघटना हिंगोली, नितीन मोरे, रावसाहेब गेंडाफळे, सुनील सुकणे, सत्यप्रकाश नांदापूरकर, सोपानराव नाईक, मनोहर डूरे, भागवत इंगोले, पवन आडे, कैलास टेहरे ॲथलेटिक संघटना परभणी, यमुनाजी भालशंकर रहीम कुरेशी,शंकर पोघे, यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सर्व खेळाडू स्पर्धकांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी स्पोर्ट्स अथोरिटी ऑफ इंडिया चे महत्व सांगितले आणि खेळाडूंना भावी यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.
वयोगट १४ व १६ वर्षे या दोन गटात जिल्हास्तरीय निवड चाचणी मैदानी स्पर्धा घेण्यात आली. क्रीडा स्पर्धेचे प्रास्ताविक संघटनेचे सचिव रमेश गंगावणे यांनी केले. जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश मारावार सरांनी अमूल्य मार्गदर्शन केले आभार प्रदर्शन नितीन मोरे यांनी केले.



हिंगोली- येथील संत नामदेव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डात सोमवारी मोठ्या प्रमाणावर हळद विक्रीसाठी आली होती. हळदीला प्रतिक्विंटल १३ हजार रूपये भाव मिळत असून सुमारे १५०० क्विंटल हळदीची आवक झाली होती. २९ नोव्हेंबर ते ३ डिसेंबरपर्यंत मोंढा बंद असणार असल्याचे बाजार समितीच्या सुत्रांनी सांगितले आहे. छाया- विजय गुंडेकर


## संक्षिप्त वृत्त

### पवार पब्लीक स्कूलमध्ये ऑरेंज डे साजरा




हिंगोली- येथील पवार पब्लिक स्कुल मध्ये शनिवारी ता. २२ नोव्हेंबर रोजी ऑरेंज डे साजरा करण्यात आला. सर्व मुलांनी ऑरेंज रंगाची वेशभूषा परिधान करून आले होते. यावेळी विविध फळ भाज्यांचे पोस्टर तयार करून हातात धरले होते. यावेळी मुलांकडून विविध कलाकृती करून घेतल्या गेल्या तसेच काही खेळही घेण्यात आले. मुलांनी आनंदाने कलाकृती तयार केल्याने शिक्षक ही भरावून गेले. वेळी शाळेचे संचालक प्रणव पवार, सचिन धामणे, योगेश थोरात, गजानन वानरे, पंकज इंगोले, सचिन इंगोले, संतोष पाईकराव, वैभव काळे, सॉली जॉबिन, दिपाली राऊत, अपर्णा जामकर, कोमल अग्रवाल, दिपाली मधीराज, रुपाली ठाकरे, अश्विनी बोराळकर, छाया धनवे, फिजा आदींची उपस्थिती होती.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सत्कार



हिंगोली- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे परभणी जिल्ह्यातील जिंतूर या ठिकाणी नगर परिषद निवडणूक प्रचाराकरिता आले होते. त्यानंतर ते जिंतूर या ठिकाणीची प्रचार सभा आटोपल्यानंतर औंढा तालुक्यातील रामेश्वर या ठिकाणाहून नांदेड कडे जात असताना औंढा तालुक्यातील राष्ट्रवादी कार्यकर्त्यांच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष संजय दराडे, प्रवीण टोम्पे, गोपाळ मगर, भगवान इघारे, विक्की देशमुख, अनंत सांगळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी सत्कार प्रसंगी उपस्थित होते.

### पोलिसांची दोन जुगार अड्ड्यावर धाड

हिंगोली- जुगार कायद्यांतर्गत हिंगोली पोलिसांनी दोन ठिकाणी धाडी टाकून १४ हजार ९६० किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपीविरूध्द गुन्हे दाखल केले आहेत. तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत १९ ठिकाणी छापे मारण्यात आले आहेत.

# वसमत तहसीदारांकडून अवैध वाळू वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २४ नोव्हेंबर**



अवैध वाळू माफियांच्या मुसक्या आवळण्याचा प्रशासनाने निर्धार केल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. नांदेडवरून अवैध वाळू घेऊन वसमतकडे धावणाऱ्या वाहनावर तहसीलदार शारदा दळवी यांनी मध्यरात्री धडक कारवाई करत दणका दिला आहे. या कारवाईमुळे वाळू माफीयांमध्ये खळबळ उडाली आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशिरा संशयित वाहन वेगात वसमत शहरात प्रवेश करत असल्याची गोपनीय माहिती तहसील कार्यालयाला मिळाली. तत्काळ पथक तयार करून स्वतः तहसीलदार दळवी यांनी स्पॉटवर धाव घेत वाहन अडवले. तपासणी केली असता वाहनात मोठ्या प्रमाणात बिनखर्चाची वाळू आढळून आली. चालकाकडे कोणतेही कायदेशीर दस्तऐवज नसल्याने वाहन ताब्यात घेण्यात आले असून संबंधितांवर कठोर गुन्हे नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे.
स्थानिक नागरिकांच्या मते, रात्रीच्या अंधारात सुरू असलेला अवैध वाळूचा 'खंदा व्यापार' अनेक विकासकामांवर परिणाम करतोय. यामुळे नदीपात्राचे प्रदूषण, पर्यावरणाचा ऱ्हास आणि शासकीय महसुलाची लूट थांबवण्यासाठी प्रशासनाने सातत्याने छापे टाकावेत, अशी मागणी होत आहे. अवैध वाळू वाहतुक व उपसा करणाऱ्यांवर यापुढेही सतत कारवाई करणार असल्याचा तहसीलदार शारदा दळवी यांनी इशारा दिला आहे.

# गुरूवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रचारार्थ हिंगोली दौऱ्यावर?

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ नोव्हेंबर**



हिंगोली नगर पालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या अंतीम टप्प्यात भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार नीता बाबाराव बांगर यांच्या तसेच भाजपच्या नगरसेवक पदाच्या उमेदवारांकरिता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दि २७ नोव्हेंबर गुरूवारी दुपारी चार वाजता जाहीर सभा घेणार असल्याची माहीती आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली आहे.
हिंगोली नगर पालिका निवडणुकीत भाजप, शिंदेसेना आणि उबाठा शिवसेना यांच्यात तिरंगी सामना होणार असून काट्याची टक्कर होणार असल्याचे संकेत मिळत आहे. तीनही पक्षातील नेते, पदाधिकारी तसेच कार्यकर्ते जोमाने कामाला लागले असून हिंगोलीकर कोणाला मतदान करावे या संभ्रमात आहेत. तीनही पक्षांनी साम, दाम, दंड, भेद याचा वापर या निवडणुकीत केला असून ही निवडणुक आ. संतोष बांगर, आ. तान्हाजीराव मुटकुळे आणि सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे यांनी प्रतिष्ठेची केली आहे.
या निवडणुकीत भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार नीता बाबाराव बांगर तसेच भाजपचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा होणार आहे. यावेळी राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, आदिवासी विकासमंत्री अशोक ऊईके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.
महायुतीतील शिंदेसेनेच्या रेखा श्रीराम बांगर या नगराध्यक्षदाच्या निवडणुकीत आहेत. महायुतीतील दोन्ही पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकल्यामुळे निवडणुकीत चांगलीच चुरस निर्माण झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेनंतर भाजपला मोठी ताकद मिळेल असे मानले जात आहे.

# वसमतमध्ये राष्ट्रवादीचा धडाकेबाज प्रचार



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २४ नोव्हेंबर**
वसमत नगर पालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने धडाकेबाज प्रचार सुरू असून आ. राजू नवघरे मतदारांशी संवाद साधतांना दिसत आहेत.
शहरातील प्रत्येक भागात आ. नवघरे यांच्यासह उमेदवार तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते जोमाने प्रचाराला लागले असून प्रचाराची धुरा आ. नवघरे यांनी सांभाळली आहे. त्यामुळे त्यांच्या प्रचारात शेकडो नागरिक प्रतिसाद देत असतांना दिसत आहेत. दुसरीकडे विरोधकांच्या गोटात मात्र खळबळ माजली आहे. आ. नवघरे जनतेशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या तसेच अडीअडचणी बद्दल आश्वासने देत आहेत तसेच मागील काळात केलेल्या विकास कामांची माहीतीही देत असतांना दिसत आहेत.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून शहरातील सराईत गुन्हेगारांच्या घरांची झाडाझडती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ नोव्हेंबर**



आगामी होणाऱ्या निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राहून आचारसंहितेचे पालन करून कोणत्याही दबावाशिवाय अत्यंत खुल्या वातावरणात निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी हिंगोली पोलीस अतिशय आक्रमकपणे कार्यवाही करीत असून दिनांक २३ नोव्हेंबर रोजी पहाटे ०५.०० वाजल्यापासून २५ पोलीस अधिकारी व १५० कर्मचारी तसेच निवडणुक संदर्भाने निर्माण करण्यात आलेले स्थिर निगराणी पथकातील व फिरत्या पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार केंद्रे, पोनि मोहन भोसले, पोनि संदीप मोदे, पोनि श्याम कुमार डोंगरे यांच्या नियंत्रणात भल्या पहाटेपासून हिंगोली शहरातील रेकॉर्डवरील गुन्हेगार सराईत गुन्हे असलेल्या इसमांच्या घरी धडकले त्यामुळे हिंगोली शहरात एकच खळबळ उडाली आहे.
सराईतपणे गुन्हे दाखल असलेले इसमांच्या घरी पोलीस पथकांनी जाऊन त्यांच्या घराची झाडाझडती घेऊन अवैध शस्त्र किंवा अवैध रीतीने निवडणूक संदर्भाने इतर पैसे वगैरे किंवा निवडणुकीत बाधा आणण्यासाठी काही साहित्य ठेवले आहे का याबाबत तपासणी करण्यात आली, तसेच संशयित इसमांच्या वाहनाची सुद्धा तपासणी करण्यात आली.
एकूण ५० रेकॉर्डवरील इसमांच्या घरची व वाहनांची व कार्यालयाची जाडाझडती घेण्यात आली असून दोन इसमाविरुद्ध अवैध हत्यार बाळगणे संदर्भाने राजू लक्ष्मण कोठुळे वय २२ वर्ष व्य.मजुरी रा.बासंबा ता.जि. हिंगोली , महेश संतिष गीते वय २३ वर्ष राहणार चांदापूर ता. परळी जी. बिड यांचे विरुद्ध पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात आले आहे.
यानंतर सुद्धा आवश्यकता वाटेल तेव्हा पोलिसामार्फत रेकॉर्डवरील गुन्हेगारांची व निवडणुकीत बाधा आणणाऱ्या संशयित इसमांची झाडाझडती घेण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# श्री रेणुकादेवी मंदिर गडावरील लघु व्यवसायकांची प्रतिष्ठाने रिकामी होण्यास सुरुवात

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २४ नोव्हेंबर-**

श्रीक्षेत्र माहूर गडावरील राज्यातील देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ जागृत पीठ असलेल्या श्री रेणुकादेवी मंदिर गडावर केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी मातेच्या दर्शनासाठी २५० गड पायऱ्या चढणे-उतरणे असमर्थ असलेल्या भाविकांच्या सुविधेसाठी ५१ कोटी रुपयांचा भरीव निधी देऊन लिफ्ट आणि स्कायवाकच्या कामाला मंजुरी दिली होती. त्या प्रकल्पाचे काम अनेक अडथळे पार करत संथगतीने का होईना सध्या प्रगतीपथावर



आहे.परंतु ह्या प्रकल्पाचे काम करताना पायऱ्या चढताना उजव्या बाजूला दुकाने असलेल्या अनेक लघुव्यवसायिकांच्या उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या दुकानांना स्थलांतरित करण्याचा यक्षप्रश्न निर्माण झाला आहे .मात्र आता प्रशासनाकडून यावर उचित तोडगा काढण्यात आला असून,संभाव्य पार्किंगच्या ठिकाणी गाळे निर्मिती करून त्यांना प्रतिष्ठान रिकामी करण्यात सांगण्यात आल्याने दि.२४ नोव्हेंबर रोजी लघु व्यावसायिकांनी तहसीलदार अभिजीत जगताप यांच्या उपस्थितीत आपले प्रतिष्ठान रिकामे करण्यास सुरुवात केल्याने लिफ्ट आणि स्काय वॉकच्या कामाला आता खऱ्या अर्थाने गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

श्रीक्षेत्र माहूर गडावरील श्री रेणुका माता मंदिरात येणाऱ्या वयोवृद्ध भाविकांना अडीचशे पायऱ्या चढण्या साठी त्रास होत होता. सदरील बाब केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या लक्षात आणून दिल्याने त्यांनी भाविकांना सुलभ व जलद दर्शन सुविधा मिळावी यासाठी ५१ कोटी रुपये खर्चाच्या लिफ्ट आणि स्काय वॉकच्या कामाला मंजुरी दिली होती. परंतु येथे पायऱ्याच्या शेजारी असलेल्या लघु व्यावसायिकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला होता.त्यामुळे डाव्या बाजूकडील दरड मध्ये भराव टाकून येथे गाळे निर्मिती करण्यात आली असून, त्या ठिकाणी सदरील ३५ लघु व्यावसायिकाच्या स्थलांतराचा प्रश्न निकाली काढण्यात आला. त्यामुळे काहीं व्यवसायिकांनीआपापले प्रतिष्ठान काढून घेण्यास सुरुवात केली असून, काही प्रतिष्ठाने रिकामे करण्यात आलेली आहेत.

सदरील लिफ्ट आणि स्काय वॉक चे काम तसेच व्यवसायिकांचे स्थलांतर व इतर विकास कामे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, नांदेड जिल्ह्याचे अधीक्षक अभियंता संभाजी धोत्रे, सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला, कार्यकारी अभियंता विशाल चोपडे तसेच श्री रेणुका देवी संस्थान प्रशासन यांचे मार्गदर्शनाखाली तहसीलदार अभिजीत जगताप, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता डी.के. भिसे,उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांचे मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## अयप्पा स्वामी देवालयात विशेष धार्मिक कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २४ नोव्हेंबर-**

शहरातील माहुर रोडवरील श्री अय्यप्पा स्वामी देवालयामध्ये शुक्रवार, दि. ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



श्री गजानन दामन्ना तिरमनवार (गुरु स्वामी), रा. गोकुंदा यांनी श्री अय्यप्पा स्वामींची दीक्षा पूर्ण १८ वर्षे पूर्ण केल्याच्या निमित्ताने पारंपरिक नारिकेळ महापडी पूजन मोठ्या भक्तिभावाने आयोजित केले आहे.

या विशेष महापडी पूजनासाठी शहर व पंचक्रोशीतील अय्यप्पा स्वामी भक्त, दीक्षा स्वामी तसेच विविध भजनी मंडळांचे उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पूजा विधी पारंपरिक तामिळ पद्धतीने, मंत्रोच्चार व दीपप्रज्वलनासह करण्यात येणार असून कार्यक्रमानंतर महाप्रसादाचेही आयोजन आहे.

श्री अय्यप्पा स्वामी देवालयम, माहुर रोड येथे होणाऱ्या या कार्यक्रमामुळे परिसरात भक्ती, शिस्त आणि आध्यात्मिकतेचे वातावरण अनुभवायला मिळणार आहे.

## पुरस्कार प्राप्त पत्रकार परमेश्वर पेशवे यांचा आ. केराम यांनी केला सन्मान

**नांदेड**-नुकतेच मदत फाउंडेशन सामाजिक संस्था नागपूरच्या वतीने किनवट तालुक्यातील इस्लापूर येथील रहिवासी असलेले दैनिक गावकरीचे तालुका प्रतिनिधी परमेश्वर पेशवे यांना नागपूर येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्यानंतर किनवट माहूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम, प्राध्यापक किशनराव मिराशे यांनी सोनपेठ येथील बिरसा मुंडा जयंतीच्या व्यासपीठावर शाल श्रीफळ व हार देऊन त्यांनी सन्मान केला. व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर इस्लापूर ग्रामपंचायतचे सरपंच प्रतिनिधी नारायण शिनगारे माजी सरपंच सूर्यकांत बोधनकर ,ज्येष्ठ पत्रकार नारायण दंतलवाड,जगदीश हनवते ,गौरव कदम, पत्रकार प्रमोद जाधव ,विकास माहुरकर, यांनी इस्लापूर ग्रामस्थांच्या वतीने सत्कार केला. तर शासकीय आश्रम शाळा सहस्त्रकुंड येथील मुख्याध्यापक बुरकुले सर व त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या वतीने शासकीय आश्रम शाळा सहस्त्रकुंड येथे सुद्धा त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांना मिळालेल्या राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारा संदर्भात आदिवासी नेते, दादाराव टारपे, नांदेड जिल्हा परिषद च्या माजी अध्यक्ष सौ जनाबाई डुडुळे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुर्यकांत आरडकर, पंचायत समितीचे उपसभापती कपिल करेवाड, भगवानराव हुरदुके,जयवंतराव वानोळे, परसराम फोले, माधवराव वानोळे, बालाजी आलेवार, माजी भाजपा तालुकाध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष बाबुराव केंद्रे, शिवसेनेचे गजानन बच्चेवार, तालुका आरोग्य अधिकारी किशनराव गायकवाड ,डॉक्टर गीत कुमार पवार,डॉक्टर आनंद सूर्यवंशी, डॉक्टर शिवाजी शिंदे, डॉक्टर भगवान गंगासागर, भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते रवी कसबे, आनंद साखरे, राजेश गायकवाड, शिवाजी बोटेवाड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र घोगरे, सचिव दिलीप रायफलवार, हुडी येथील शिवसेनेचे जेष्ठ कार्यकर्ते नंदकुमार देशमुख, पांडुरंग पाटील भिसीकर, खंडू गिरासे, जगदीश माने, यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवरांनी पुढील कार्यासाठी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले. त्याचबरोबर समाज बांधवांच्या वतीने किनवट नगरीमध्ये भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

## हिमायतनगर तालुक्यात राष्ट्रीय कुष्ठरोग शोध मोहीमेला जोरदार प्रतिसाद

**हिमायतनगर**-केंद्र व राज्य सरकारच्या पुढाकाराने १७नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय कुष्ठरोग शोध मोहिमेला हिमायतनगर तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून संपूर्ण आरोग्य यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे. तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक-सेविका तसेच आशा स्वयंसेविका व स्वयंसेवक यांच्यामार्फत घरोघरी भेट देऊन कुष्ठरोगाच्या संशयित रुग्णांचा शोध घेण्याचे काम वेगाने सुरू आहे. मोहिमेअंतर्गत केवळ घरभेट नव्हे तर शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती, गावांमधील मंदिरावरील लाऊडस्पीकर, दवंडी आणि विविध प्रसारमाध्यमांद्वारे माहितीपर घोषणा करून नागरिकांमध्ये जागरूकता वाढविण्यात आली आहे. कुष्ठरोगाची लक्षणे, त्यावरील उपचार मोफत उपलब्ध असल्याची माहिती तसेच रोग पूर्णपणे बरा होऊ शकतो हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात आला आहे.

या मोहिमेबाबत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, विनामूल्य तपासणी करून घ्यावी, कुठलीही शंका असल्यास आरोग्य यंत्रणेशी संपर्क साधावा, असे आवाहन माननीय गटविकास अधिकारी नारवटकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. धम्मपाल मुनेश्वर, आरोग्य विस्ताराधिकारी राजू नागमवाड तालुका कुष्ठरोग तंत्रज्ञ टी. एस. भोसले तसेच तालुका कार्यक्रम सहाय्यक एस. एस. देशमुख यांनी केले आहे. कुष्ठरोगाविषयीच्या सामाजिक गैरसमजांना दूर करून प्रतिबंध आणि लवकर उपचार हा महत्त्वाचा संदेश तालुक्यातील सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांतर्फे दिला जात आहे. नागरिकांनी आरोग्य विभागास सहकार्य करून या मोहिमेला यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गाढवांच्या उपचार पद्धती व हाताळण्याचे प्रशिक्षण

**बिलोली**-गाढव व खेचर (अश्ववर्गीय) प्राण्यांच्या उपचारात पशुधन सहाय्यक (LSS) व पशुधन पर्यवेक्षक यांची भूमिका अत्यंत महत्वाची असल्याने, त्यांच्यासाठी अश्ववर्गीय प्राण्यांमधील आरोग्य समस्या व त्यांचे व्यवस्थापन, व्यावहारिक मार्गदर्शन या विषयावर सगरोळी (ता.बिलोली) येथे धर्मा डाँकी सँच्यूअरी व जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या वतीने विशेष प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते, या प्रशिक्षणासाठी नांदेड जिल्ह्यातील तब्बल १०० सहाय्यक



पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षकांनी उपस्थिती लावली होती.

येथील कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ डॉ. निहाल मुल्ला यांनी कार्यरत अश्ववर्गीय प्राण्यांमधील आरोग्य समस्या व त्यांचे व्यवस्थापन, व्यावहारिक मार्गदर्शन या विषयावर माहिती दिली व प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नांना उत्तरे दिली. पशुसंवर्धन विभाग नायगाव येथील सहाय्यक आय्युक्त डॉ. गौतम खिल्लारे यांनी पशुपालक आणि दवाखाना यांच्यातील दुरावा कमी करण्या हेतू शासन स्तरावर करावयाच्या उपाययोजना बाबत मार्गदर्शन केले. सगरोळी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील कार्यरत पशुवैद्यक विकास गड्डेवाड यांनी प्राणी क्लेश प्रतिबंध कायदा १९६० यावरती प्रकाश टाकला. बिलोली तालुक्याचे पशुवैद्यकीय विस्तार अधिकारी डॉ. शंकर उदगिरे यांनी, लसीकरण व कृमिनाशकचे महत्व संगून मात्रा व पद्धत सांगितली यासह त्यांनी पोटसूळ आजाराची लक्षणे, निदान व उपचार पद्धतीवर प्रकाश टाकला. उपचार करताना गाढव प्राण्यास कसे हाताळावे त्यास हेडकॉलर कसे घालावे याचे प्रत्याक्षित देण्यात आले. सदर प्रशिक्षण जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. राजकुमार पडीले आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणामुळे जिल्ह्यातील गाढव व खेचर या प्राण्यांना योग्य उपचार मिळतील यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी धर्मा डाँकी सँच्यूअरी संस्थेचे विश्वस्त रोहित देशमुख, अभिजीत महाजन, यांची उपस्थिती होती, कार्यक्रम यशस्वितेकरिता अंकुश देशमुख, अनन्याकश्यप राव यांनी परिश्रम घेतले.

# अनु. जाती महिला प्रवर्गातून सिडको प्रभाग २० मध्ये भाजपकडून पाच उमेदवार इच्छुक

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २४ नोव्हेंबर-**

नांदेड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका २०२५ च्या निवडणुका कार्यक्रम लवकरच जाहीर होणार असल्याने भारतीय जनता पार्टीच्या वतीने सिडकोतील प्रभाग क्रमांक २० मधून अनुसूचित जाती महिला प्रवर्गातून पाच उमेदवार इच्छुक असल्याने पक्षश्रेष्ठी कुणाच्या हातावर कमळ देणार तर कोणाच्या हातावर तुरी देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आगामी चालू असलेल्या नांदेड वाघाळा शहर महापालिका सार्वत्रिक निवडणुकांचे वारे जोरात वाहत असल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये चुरस निर्माण झाली आहे. भारतीय जनता पार्टीच्या वतीने




सिडको प्रभाग क्रमांक २० मधन अनुसूचित जाती महिला प्रवर्गातून पाच उमेदवार इच्छुक असल्याने योग्य त्या उमेदवारास पसंती देणे पक्षश्रेष्ठीला तारेवरची कसरत करावी लागणार आहे. इच्छुक उमेदवारमध्ये माजी नगरसेविका तथा शिक्षिका व सामाजिक कार्यकर्त्या बेबीताई जनार्धन गुपिले या चालू नगरसेविका असल्याने ते उमेदवारीची दावेदार असल्याचे बोलले जाते. तसेच सिद्धार्थ धूतराज जिल्हा उपाध्यक्ष नांदेड महानगर भाजपा हे गेल्या वीस वर्षापासून भाजपमध्ये एकनिष्ठतेने कार्य करत आहेत. भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष म्हणून गेली दहा वर्षे त्यांनी काम बघितले आहे. भाजप जिल्हा सचिव तीन वर्ष, भाजप सिडको मंडळ प्रभारी तीन वर्ष, पदवीधर नोंदणी संयोजक सिडको मंडळ या सर्व पदावरून गेली २० वर्ष पासून कार्यरत आहेत. यांच्या सुविधे पत्नी सौ. छाया सिद्धार्थ धूतराज या कमळ या निशाणीवर निवडणूक लढवण्याच्या प्रतीक्षेत आहेत. त्याचप्रमाणे सिडको हडको परिसरातील सामाजिक कार्यकर्ते व मागची अपक्ष म्हणून निवडणूक लढवलेले राजू लांडगे यांच्या पत्नी बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे मोठे संघटन व सर्वत्र परिचित असलेल्या सौ. निरंजना राजू लांडगे ह्या देखील भारतीय जनता पार्टी कडून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. तसेच या प्रभागातील सामाजिक चळवळीत सतत काम करणारे प्रा. शशिकांत हटकर यांच्या पत्नी उच्च शिक्षित असलेल्या सौ. मनीषा शशिकांत हटकर ह्या देखील या प्रभागातून भाजपकडून निवडूनुक लढवण्यास इच्छुक आहेत. तर त्याचप्रमाणे बऱ्याच काळापासून राष्ट्रीय सेवा संघाच्या माध्यमातून गेली दहा वर्षापासून कार्यरत असलेले व सामाजिक, धार्मिक, राजकीय कार्यात हिरीरीने भाग घेणारे सध्या अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष भारतीय जनता पार्टी या पदावर कार्यरत असलेले सामाजिक कार्यकर्ते नवनाथ पांडुरंग कांबळे यांच्या आई निर्मलाबाई पांडुरंग कांबळे हे देखील भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती राखीव महिला प्रभागातून निवडणूक लढवण्यास तयार आहेत. तेव्हा या प्रभागातून उमेदवार निवडण्याचे मोठे आव्हान पक्षापुढे असणार आहे. तेव्हा भारतीय जनता पार्टी कोणाच्या हातात कमळ देईल तर कोणाच्या हातात तुरी देईल ही वेळ आल्यावरच समजेल सध्या तरी वरील सर्वच इच्छुक उमेदवार आपापल्या परीने मतदारांसी भेटीगाठीच्या कामाला लागले असल्याचे दिसून येत आहे.

## हिमायतनगर नगरपंचायतीवर काँग्रेसची सत्ता येणार : सपकाळ



**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २४ नोव्हेंबर-**

नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने दि.२३ नोव्हेंबर रोजी शहरात काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार शेख रफिक शेख महेबुब यांच्या संपर्क कार्यालयास भेट देऊन उपस्थित मतदारांसह जनतेला आवाहन केले कि,येत्या दि.२ डिसेंबर रोजी जनतेच्या मनातील उमेदवारास काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली आहे. त्या उमेदवारास भरघोस मत देऊन विजयी करा.महाराष्ट्रात वोट चोरी करणाऱ्या भाजपाला व शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या दुष्ट प्रवृत्तीच्या राक्षसास हद्दपार करण्यासाठी मतदान रुपी आशीर्वाद देऊन त्यांना त्यांची जागा दाखवुन द्या.

काँग्रेस पक्ष सर्वांना घेऊन चालणारा पक्ष आहे. तुमच्या भागातील माजी आमदार जवळगांवकर यांनी यावेळी जनतेच्या मनातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांना उमेदवारी दिली आहे. त्या उमेदवारांस माय बाप जनतेनी प्रचंड बहुमतांनी विजयी करुन काँग्रेसचे हात बळकट करा,नक्की हिमायतनगरचा विकास करु,असे ही शेवटी म्हणाले आहे.

यावेळी माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकरांसह नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार शेख रफिक शेख महेबूब सह एकुण सतरा प्रभागातील उमेदवार उपस्थित होते. तर मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

## संविधान अमृत महोत्सवानिमित्त उपक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ नोव्हेंबर-**

भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान शासन निर्णय परिपत्रक १८ नोव्हेंबर २०२५ नुसार २६ नोव्हेंबर २०२५ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत सर्व शासकीय विभागाचे कार्यालयात, महाविद्यालये, शाळा, वसतिगृहामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागाचे कार्यालय, महाविद्यालय, शाळा, निवासी शाळा व मुला-मुलींचे शासकीय वसतिगृहामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी आदेशीत केले आहे. संविधान प्रभातफेरीमध्ये सर्व नागरीकांनी सहभागी होण्याचे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केली आहे.

## निवडणूक उत्साहात आणि कायदेशीर चौकटीत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २४ नोव्हेंबर-**

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्रांच्या छाननीनंतर वैध ठरलेल्या १०२ नगरसेवक पदासाठी व ५ नगराध्यक्ष पदासाठीच्या उमेदवारांना निवडणूक सूचनांचे आज (सोमवारी) रोजी सभेचे आयोजन करुन मार्गदर्शन करण्यात आले.



आज (२४ नोव्हेंबर) रोजी सकाळी ११.०० वाजता नगरपरिषद सभागृहात झालेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीस एकूण १०७ उमेदवार व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीचे अध्यक्षस्थान निवडणूक निर्णय अधिकारी श्री. अनुप पाटील यांनी भूषविले तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सौ. निलम कांबळे उपस्थित होत्या. या बैठकीत उमेदवारांना निवडणूक आचारसंहितेचे पालन, निवडणूक खर्चाचे नियम, मर्यादा व सादर करावयाच्या कागदपत्रांची माहिती आणि निवडणूक कार्यक्रमानुसार पुढे पार पडणाऱ्या प्रत्येक प्रक्रियेचे स्पष्टीकरण यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी उपस्थित उमेदवारांनी निवडणुकीसंदर्भात विचारलेल्या विविध प्रश्नांना निवडणूक अधिकाऱ्यांनी शंकांचे निरसन करण्यात आले तसेच त्यांना समाधानकारक उत्तरे देण्यात आले. या निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि शिस्तबद्धता राखण्यासाठी घेतलेली ही बैठक अत्यंत सकारात्मक आणि फलदायी ठरली असून आगामी निवडणूक उत्साहात आणि कायदेशीर चौकटीत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले आहे.

## काँग्रेसच्या प्रचार शुभारंभ रॅलीस प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २४ नोव्हेंबर-**



हदगाव नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदाचे उमेदवार कुमुद सुनील सोनुले यांच्यासह १० प्रभागातील २० उमेदवारांसाठी प्रचार शुभारंभ सोहळ्याचे आयोजन माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत देव उखळाई आश्रम डोंगरगाव रोड इथून प्रारंभ करण्यात आले. प्रचार शुभारंभ निमित्ताने काढण्यात आलेल्या काँग्रेसच्या रॅलीस मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. पद यात्रेच्या मार्गावरील विविध महापुरुषांच्या फलकास मंदिरास, दर्गा येथे हार, श्रीफळ फोडून दर्शन घेण्यात आले. जागोजागी उमेदवारांचे मतदारांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले एकूणच काँग्रेसच्या प्रचार शुभारंभ रॅलीने हदगाव शहरातील वातावरण ढवळून निघाले होते.


हदगाव नगरपालिकेसाठी येत्या २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून या निवडणुकीत काँग्रेसचे माजी आमदार जवळगावकर यांच्या नेतृत्वाखाली सक्षमपणे निवडणूक रिंगणात उतरलेल्या काँग्रेस पार्टीच्या नगराध्यक्षपदाचे उमेदवार कुमुद सुनील सोनूले ( हदगावकर मॅडम ) यांच्यासह २० उमेदवार यांच्या प्रचाराच्या शुभारंभ मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पार पडले त्याच्या प्रचार शुभारंभाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या पदयात्रेस प्रचंड प्रतिसाद मिळाला. यात महिलांची संख्या लक्षणीय दिसून येत होती. ढोल ताशाच्या गजरात निघालेल्या रॅलीस मतदारांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला यावेळेस काँग्रेस पार्टीचे आजी-माजी पदाधिकारी जेष्ठ कार्यकर्ते व सर्व उमेदवार उपस्थित होते.

## मुदखेड नगरपालिकेत उमेदवारी वाटपाने खळबळ !

### दोन्ही पक्षांत नाराजीचा स्फोट ; वरिष्ठांचा 'गुप्त डाव' चर्चेत

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २४ नोव्हेंबर-**

आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांनी उमेदवारी वाटपामुळे शहराच्या राजकारणात प्रचंड खळबळ उडाली आहे. वरिष्ठांच्या अचानक घेतलेल्या निर्णयांवर स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांसह समर्थकांमध्ये ही नाराजीचा स्फोट झाल्याचे दिसत असून, हा सर्व प्रकार गुप्त आंतरिक डावपेचांच भाग असल्याची चर्चा चांगलीच रंगली आहे.



मुदखेड ची लोकसंख्या ५३ टक्के हिंदू, ३० टक्के मुस्लिम आणि १५ टक्के अनुसूचित जाती अशी असताना दोन्ही पक्षांनी दिलेले तिकीट संयोजन आश्चर्यकारक ठरले आहेत. या मध्ये प्रामुख्याने ब्राम्हण व मारवाडी समाजाला दोन्ही प्रमुख पक्षांनी उमेदवारी दिली नाही. आणि गेल्या वेळी सुद्धा उमेदवारी दिली नव्हती. या वेळी मुन्ना ( पृथ्वीराज ) चौधरी हे प्रभाग क्रमांक ०६ ( ब ) मध्ये अपक्ष उमेदवार आहेत. तर मुन्ना ( पुरुषोत्तम ) चांडक यांचे वडील प्रभाग क्रमांक ०४ ( ब ) मध्ये अपक्ष उमेदवार आहेत.

काँग्रेसने अध्यक्षपदासाठी सवर्ण उमेदवार जाहीर करताना प्रभागांमध्ये ७ मुस्लिम आणि १ आर्य वैश्य ( नगर अध्यक्ष ) तिकीट दिले. या निर्णयानंतर पक्षातील ओबीसी आणि मराठा गटात उघड असंतोष दिसत आहे. काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी अंतर्गत बैठका घेऊन तीव्र नाराजी नोंदवल्या ची माहिती मिळते.

तर दुसरीकडे भाजपने अध्यक्षपदी मराठा चेहऱ्यांवर विश्वास दाखवला असला तरी प्रभाग पातळींवर ७ मुस्लिम उमेदवारांना दिलेल्या उमेदवारीमुळे पक्षाच्या कोअर समर्थकांमध्ये आश्चर्य आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.या दोन्ही पक्षांत एकाच वेळी निर्माण झालेल्या दुराव्या मुळे राजकीय वर्तुळात एकच प्रश्न घुमतो आहे. वरीष्ठांनी जाणूनबुजून दोन्ही पक्षातील समीकरणे ढवळून काढली आहेत का?

यामुळे स्वतंत्र उमेदवारांना मोठी संधी निर्माण होत असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. काही संभाव्य बंडखोर उमेदवारांनीही मैदानात उतरण्याची तयारी सुरू केल्याची विश्वसनीय माहिती मिळते.मुदखेडचे राजकारण उमेदवारी वाटपामुळे तापले असून, एकूणच शहरात कोणता गुप्त खेळ सुरू आहे? यावर चर्चा शिंगेला पोहोचली आहे.

# 'सैनिक हो तुमच्यासाठी'चा ५८ वा प्रयोग २६ नोव्हेंबरला कुसूम सभागृहात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ नोव्हेंबर-**

मुंबईवर २६/११ रोजी झालेल्या हल्लयातील शहीदांना श्रध्दांजली तसेच देशभक्तीपर भावना जागृत करण्यासाठी दि.२६ नोव्हेबर २०२५ रोजी कुसूम सभागृह नांदेड येथे सायंकाळी सहा वाजता पत्रकार विजय जोशी प्रस्तूत सैनिक हो तुमच्यासाठी....चा ५८ वा प्रयोग सादर होणार आहे. यात महाराष्ट्रातील अनेक दिग्गज कलावंत सहभागी होणार आहेत. नांदेड जिल्हा पोलीस दल आणि संवाद संस्थेची हि निर्मिती आहे.

इ.स.२००८ पासून हा कार्यक्रम सातत्याने होत असून, आतापर्यत नांदेडसह पुणे तसेच तेलंगणा व कर्नाटकात देखील याचे प्रयोग झाले आहेत. एकूण ५७ प्रयोगात जवळपास राज्यातील बाराशेहून अधिक दिग्गज कलावंत व वादकांनी सहभाग नोंदविला आहे. कार्यकमाचे सातत्य आणि देशभक्तीची भावना या माध्यमातून या कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे.

कुसूम सभागृहात होणाऱ्या या ५८ व्या प्रयोगाचे उद्घाटन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते होणार असून, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, प्रजावाणीचे संपादक शंतनू डोईफोडे आदीची उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमाचे दिग्दर्शन ॲड.गजानन पिंपरखेडे आणि बापू दासरी यांचे असून, प्रख्यात निवेदिका डॉ.सौ.वैशाली गोस्वामी या कार्यक्रमाचे नियोजन करणार आहेत. संभाजीनगरच्या प्रख्यात गायिका सरला शिंदे, गौरव पवार, राहुल वाव्हुळे तर नांदेडचे प्रख्यात कलावंत श्रीरंग चिंतेवार व पौर्णिमा कांबळे हे देशभक्तीपर रचना सादर करणार आहेत. आरती क्रिऐशन्स छत्रपती संभाजीनगरचे नृत्य कलावंत यावेळी देशभक्तीपर रचनांच्या माध्यमातून विविध नृत्य देखील सादर करैन शहिदांना श्रध्दांजली अर्पण करणार आहेत. या नृत्याचे दिग्दर्शक उमेश चाबुकस्वार छत्रपती संभाजीनगर यांचे आहे. संगीतसाथ छत्रपती संभाजीनगरचे राजू जगधने, राजेश भावसार, अभिजित शिंदे, गणेश चव्हाण आदी करणार असून, विशेष आकर्षण म्हणून नवोदित व्हायोलिन वादक डॉ. गुंजन शिरभाते या या कार्यकमात आपली विशेष झलक सादर करणार आहेत. पत्रकार विजय जोशी व संवाद संस्थेच्या माध्यमातून हा कार्यक्रम सादर होणार असून, नांदेड जिल्हा पोलीस दल यांनी या कार्यक्रमास सहकार्य केले आहे. कुसूम सभागृहात दि.२६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता हा कार्यक्रम वेळेवर सुरै होणार असून, रसिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.